म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा
दा. क्र. २६१४

दा.क्र. २६१४
२६१४

# पुण्यश्लोका

# कस्तुरबा

IRBK-0102614
IRBK-0102614

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र-वाङ्मय
वा. नं. २८

# बा कस्तुरबा



महाराष्ट्र ग्रंथभांडार कोल्हापूर

૨૯૧૨

२६१४

# पुण्यश्लोका कस्तूरबांच्या आठवणी

म. ग्रं. सं. ठाणें.

IRBK-0102614

महाराष्ट्र ग्रंथभांडार

किंमत १० आणे.

प्रकाशक—

**गोविंद वामन कुलकर्णी**

महाराष्ट्र ग्रंथभांडार कोल्हापूर

महाशिवरात्र शके १८६८, सन १९४७.

मुद्रक:— पहिलीं ८ पृष्ठें

**अनंत गणेश जोशी,** दि स्टार प्रेस, कोल्हापूर.

बाकीचीं पृष्ठें,

**गणेश वासुदेव गोडसे,** चैतन्य मुद्रामंदिर, सातारा.

## प्रस्तावनेदाखल चार शब्द

— या आठवणी म्हणजे पुण्यश्लोका कस्तुरबांच्या महान् व्यक्तित्वाची पूजा, ओळख नव्हे. ज्या काळीं महात्माजी महात्मा नव्हते, या महानतेची त्यांना स्वतःला अथवा इतरांनाहि जाणीव नव्हती त्या कालापासून त्यांच्या व्यक्तित्वांत आत्मलोप करून जीवन जगणाऱ्या एका श्रद्धावती भारतमहिलेच्या स्मृतीला वाहिलेली ही पुष्पांजली आहे. महात्माजींचें जीवन म्हणजे ज्वलंत अग्निसाधना आणि कस्तुरबा त्या अग्निदिव्यांतून उजळून निघालेली सती. सतीच्या स्मृतीहि पावक असतात.

पुण्यश्लोका कस्तुरबांच्या मृत्युमुळें यथार्थनामा ठरलेल्या शिवरात्रीला या आठवणी प्रकाशित होत आहेत. विलंबाबद्दल ‘क्षमस्व’ याखेरीज मी काय म्हणूं शकणार.

— प्रकाशक

म. ग्रं. सं. ठाणें.

# प्रकाशित बालवाङ्मय

| आमचे सण | किंमत |
| --- | --- |
| १ तिळगूळ घ्या गोड बोला | ५ आणे |
| २ महाशिवरात्र | ५ ,, |
| ३ होळी | ५ ,, |
| ४ गुढी पाडवा | ८ ,, |
| ५ सोन्याचा दसरा | ५ ,, |
| ६ नागपंचमी | |
| ७ हरतालिका | |
| ८ वसंत गौर | |
| ९ राखी पुनव | |
| १० मंगलमूर्ति | |
| ११ सती सावित्री | |
| १२ नाताळ | |
| इतर | |
| १ फुलराणी | ५ आणे |
| २ गुलाबकळी | ५ ,, |
| ३ राया अथवा बालमूर्तिकार | ७ ,, |

# पुण्यश्लोका कस्तूरबा.

वैराग्याच्या प्रचारकांनीं मृत्युदेवतेचें भयंकर वर्णन ठिकठिकाणीं केलें आहे. आद्य श्री शंकराचार्यांपासून तों तहत समर्थ रामदासस्वामीपर्यंत सर्वांनीं मनुष्यजातीनें आपला विलासी जीवनक्रम बदलावा म्हणून शरीराचीं जुगुप्सापूर्ण वर्णनें केलीं आहेत आणि अज्ञात अशा मृत्यूला भयानक बनविलें आहे.

" मृत्युकाळ काठी निकीं । बैसे बळियाचे मस्तकीं ।
महाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ॥ " रामदास.

परंतु अशा प्रचारानें मानवविलास विमुख तर झालेच नाहींत. उलट जीवनशोधनाच्या अखंड प्रयत्नांत असलेले मानव अज्ञाताकडे पहातांना अर्वाचीन कालांत भयचकित दृष्टीचा त्याग करून कुतूहलपूर्ण व जिज्ञासाभरित नेत्रांनीं अवलोकन करीत आहेत. भगवद्गीतासुद्धां " आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम् । " असाच जीवनाचा उल्लेख करिते. तिच्या दृष्टीला जीवन–मरण भिन्न नाहींत. आणि जीवनाचें मूल्य ती सुखदुःखानें मापीतहि नाहीं. कविवर्य रवीन्द्रनाथ ठाकूर तर " मृत्यु माझा परमसखा आहे. " अशा उद्गारांनीं मृत्यूचें स्वागत करतात.

गुजरातच्या एका थोर कवीनें मृत्यूचें निर्विकल्प भावनेनें सुंदर वर्णन केलें आहेः—

**जन्म ने मृत्यु छे उभय सुंदर जगे ।**
**हो भले उभयना पंथ न्यारा ॥**
**पण खरे मृत्यु ये अधिक सुंदर दिसे ।**
**ज्यां खिले मात्र शुभस्मरणक्यारा ॥**

'जन्म आणि मृत्यु दोन्ही सुंदर आहेत. दोहोंचे मार्ग भिन्न असले म्हणून काय झालें! तरीसुद्धां मृत्यु अधिक सुंदर आहे. कारण त्याच्या आसपास पवित्र स्मरणकुसुमांचा ताटवा फुललेला असतो!'

ही कल्पना किती रम्य आहे व तितकीच खरीही आहे! जीवनाला वसंत ऋतूंतील पालवी म्हटलें जातें तर मृत्यूला शिशिरांतील गलितपर्णें अशी संज्ञा आहे. परंतु या शिशिरामागूनही स्मरणपुष्पांचा वसंत फुलतो, तेव्हां तो वांछनीय व कमनीय नाहीं असें कोण म्हणेल!

मृत्यूचें परिवर्तन स्मृतींत व विषादाचें गीतांत होतें! जीवनाचा अंत—हा सुंदर मृत्यु क्षणभर थांबला आहे आणि आपले अखेरचे शब्द परमशांतींत उच्चारीत आहे. त्यांनाच अमर जीवात्म्याचीं पवित्र संस्मरणें म्हणावें!!

* * *

एका पवित्र वत्सल नारीचीं संस्मरणें देण्याचा मानस आहे. महात्मा गांधीसारख्या अचल, आत्मस्थित कर्मयोग्याजवळ ही स्त्रीमूर्ति उभी आहे. ती सीतेसारखी वीर्यशुल्का नाहीं, द्रौपदीप्रमाणें पतीला वीरोन्माद आणणारी नाहीं. मदालसेप्रमाणें वैराग्यशाली माता नाहीं, चुडालेप्रमाणें योगिनी नाहीं, अमृतत्वाची पिपासू मैत्रेयीहि नाहीं. या भारतवर्षांत महिलांचे स्वतंत्र आदर्श हवे तेवढे आहेत. पूज्य कस्तूरबा स्वतः एक गौरवान्वित नारी होत्या तरी वर्षानुवर्षे भारतांत जीवन व्यतीत करणाऱ्या हजारों हिंदु महिलापेक्षां त्यांच्यांत वैशिष्ट्य असें नव्हतेंच. पतीला पूज्यदेवता मानून त्याच्या इच्छेस अनुवर्ति राहाण्याचा हिंदु महिलांचा जीवनक्रमच त्या जाणीत होत्या. व त्या दृष्टीनें थोर पतीच्या अनुषंगामुळें त्यांची श्रीरामकृष्णांच्या पत्नी पवित्र माता शारदादेवी यांशीं तुलना करितां येईल. आपलें जीवन त्यांनीं स्वहस्तें आपल्या पतीस अर्पण केलें. ही महान् शक्ति त्यांच्यांत असल्यामुळें त्यांना जीवनविद्या हस्तगत झाली होती असें म्हणतां येईल.

पूज्य बांचें प्रथम दर्शन मला झालें तो काळ महात्माजींच्या हिंदुस्थानांतील पहिल्या तुरुंगवासाचा होता. १९२२ च्या चळवळींत ६ वर्षांची सजा घेऊन महात्माजी येरवड्याच्या तुरुंगांत तपस्या करीत होते. त्यांना १८ मार्च रोजीं सजा झाली होती. म्हणून दर महिन्याच्या १८ तारखेस मुंबईतील भगिनी सभा भरवून भिन्न भिन्न कार्यकर्त्यांचीं व्याख्यानें करवीत. अशाच एका सभेस मी मारवाडी विद्यालयांत गेलें होतें. त्या ठिकाणीं श्री. देवदासभाईस बरोबर घेऊन बा त्या दिवशींच्या वक्त्या म्हणून हजर होत्या. त्यांची छोटीशी, कृश, शांत व संकुचित मूर्ति मीं व्यासपीठावर पाहिली व कुतूहलभरित नेत्रांनीं त्या महान् तपस्व्याच्या या नम्र सहकारिणीचें आलोचन करूं लागलें. शरीरानें अबला, महान् पतीची आश्रित हृदयानें कोमल अशी ही स्त्री आपल्या पतीच्या केवळ दाक्षिण्याचीच अधिकारी आहे कीं पतीला त्याच्या मर्यादेचें भान करून देण्याचें सामर्थ्यहि तिच्या अंगीं आहे, असे विचार मनांत येत होते.

नंतर जेव्हां श्री. सरोजिनीदेवींनीं बांना बोलण्याची विनंति केली तेव्हां शांतीची मूर्तिच अशी ती स्त्री आपल्या सौम्यशीतल आवाजांत श्रोतृगणाला आळवूं लागली. 'पूज्य बापूजी काय म्हणतात? त्यांनीं काय संदेश दिला आहे ? आपण काय केलें पाहिजे ?" आपल्या पतीच्या विभूतिपदाला शोभा देणारी ती अनुकरणमूर्ति स्वतःलाच पतीकडून मिळालेला जीवनसंदेश समयज्ञपणें जमलेल्या भगिनींना सांगत होती. धर्मतत्त्वें स्वतंत्रपणें स्फुरण्याइतकी बांची प्रतिभा नव्हती परंतु कुलीन सहधर्मचारिणींत दिसून येणारी प्रतिष्ठा व कर्तव्य यांचा त्यांच्यांत सुंदर मिलाफ दिसून येत होता. व म्हणूनच पतीच्या वचनांचा आधार घेऊनच त्यांनीं आपल्या व्याख्यानाची उभारणी केली. स्वतंत्र विचार असा सांगितलाच नाहीं.

* * *

महात्माजींच्या तेजस्वी सहवासांत असणाऱ्यांना सतत वीरधर्माची उपासना करावी लागते. पामर मनुष्यें त्यांच्याजवळ फार काळ टिकूं शकत

नाहींत. पासष्ट वर्षें जवळ जवळ ज्यांचा महात्माजींशीं निकट व सतत सहवास राहिला त्या बा किती स्थिरमतिमान् व शूर असतील याची कल्पनाच करावी. त्यांच्यांत उद्धाराची विलक्षण भक्ति होती. म्हणूनच त्या आपल्या आदर्शवादी पतीशीं इतकीं वर्षें अविनाभावें टिकूं शकल्या.

आपल्या लहानपणींच्या आठवणींत महात्माजींनीं बांच्या निर्भयतेची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. " अंधारांत एकट्यानें जावयाची मला भीति वाटे, पण तिला मुळींच वाटत नसे, " असें ते लिहितात. पतीला सतीनें केलेलें आत्मार्पण एखाद्या दुर्बल अबलेचें नव्हतें हें खास. कारण पत्नीधर्म पाळतांना त्यांनीं कर्मकांडीधर्म कधींच पाळला नाहीं. पतीची आज्ञा अयोग्य वाटली तर ती मोडण्याचें सामर्थ्य लहानपणींहि त्यांच्या ठायीं होतें. पतीला आवडत नव्हतें तरी त्या खुशाल देवळांत व मैत्रिणींकडे भेटीस जात असत. त्यांच्या शौर्याची व स्वदेशाभिमानाची एक गोष्ट येथें सांगण्यास हरकत नाहीं. दक्षिण आफ्रिकेत असतांना बांनाहि आगगाडींतून प्रवास करण्याचा प्रसंग येई व तेथील वर्णद्वेषाचा त्यांनाही उपसर्ग पोचल्याविना राहात नसे. एकदां त्या अशाच पहिल्या वर्गाच्या डब्यांतून मुलांसह प्रवास करीत होत्या. महात्माजी सोबत नव्हते. एका स्टेशनवर एक गोरा उतारू डब्यांत चढला व या हिंदी स्त्रीला आंत बसलेली पाहून तिला खालीं उतरण्यास दरडावूं लागला. बांचें क्षात्रतेज चमकून उठलें. त्या मुळींच हालेनात. आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजींत त्याच्याशीं भांडूं लागल्याः—

"I no get down; why for get down? you get down." शेवटपर्यंत त्यांनीं आपला हक्क सोडला नाहीं व त्या गोऱ्याला नामोहरम होऊन आपला हेका सोडावा लागला.

× × ×

आत्मविलोपनाचा अवघड योग या साध्वीनें सहज साधला होता तरी त्यामुळें त्यांच्या आत्म्याच्या अभिव्यक्तीला कधींही अडचण पडली

म. ग्रं. सं. ठाणे.

नाहीं. महासिंधूनीं वेष्टिलेल्या मेदिनीप्रमाणें तपस्व्याचें हृदय साध्वीच्या स्नेहसुकुमार अखंड प्रेमप्रवाहानें वेढिलें होतें. आपल्या जीवनांतील वैयक्तिक लहानमोठे प्रयोग महात्माजी बांच्या अनुज्ञेनेंच करीत असत. आपल्या आदर्शवादाच्या ओझ्याखालीं महात्माजींनीं आपल्या पत्नीला दडपून टाकलें असाही लोकांत एक प्रवाद आहे. तें बरोबर नाहीं. सन १९२८ किंवा २९ च्या सुमारास आपणांस कोणा भक्तहृदयी दर्शनेच्छूंनीं दिलेले रुपये बांनीं आश्रमाच्या खजिन्यांत दाखल केले नाहींत म्हणून महात्माजींनीं यंग इंडियांतील एका लेखांत त्यांच्या या कृत्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें होतें. त्यावेळीं एका गुजराती लेखिकेनें एका गुजराती वर्तमानपत्रांत महात्माजींवर कडक टीका केली होती; त्या समयीं हें प्रकरण सर्वत्र बरेंच गाजलें होतें. यानंतर माझी व बांची आश्रमांत भेट झाली असतां मीं त्यांस सहज वरील प्रसंगाबाबत स्वतःचा अभिप्राय विचारला, त्यांनीं एक मधुर स्मित करून उत्तर दिलें, "बापूजींनीं तो लेख मला दाखविला व म्हटलें कीं तुझी इच्छा असेल तर तूंही लेख लिहून आपलें मत लोकांस कळव; पण मीं तिकडे दुर्लक्ष केलें, मला तसें कांहीं करावयाचें नाहीं, लोकांना वाटेल तें लोक बोलोत,"

प्रेम हें चिरकालीन गूढ आहे, त्याचें स्पष्टीकरण करण्यास साधन नाहीं. रामानें सीतेचा अन्याय केला कीं नाहीं तें सीताच सांगूं शकेल !

*　　　*　　　*

**बा** तरुणपणीं फार देखण्या होत्या असें ऐकिवांत आहे. संसारांत स्त्रीपुरुषांचें आकर्षण द्यावापृथ्वीप्रमाणें नित्य आहे, हें आपण पहातोंच. महात्माजींनीं आपल्या आत्मकथेंत केलेलें वर्णन वाचून या दंपतीचा प्रणयविकास कांहीं लोकविलक्षण पद्धतीनें झाला असें मुळींच वाटत नाहीं. दोघेही बालच होतीं. तथापि प्राथमिक अनुभवाचें वर्णन एकदां महात्माजींनीं विनोदांत मजजवळ केलेलें आठवतें. १९२९ सालीं आश्रमाजवळील एका

बंगल्यांत महात्माजींनीं आपल्या पुतण्याच्या मुलीचें लग्न लावून दिले. समारंभ आटोपल्यावर आम्ही परत येत असतां मी महात्माजीस विचारलें, " हें विवाहमंगल चालू असतां तुम्हांला स्वतःच्या लग्नाची आठवण झाली नाहीं कांहो ? " किंचित् हंसून महात्माजी म्हणाले, " स्वतःचा लग्नप्रसंग कोण विसरूं शकेल ? आठवतें, माझेंहि विवाहमंगल मला चांगलेंच आठवतें. खास गोष्ट आठवते ती ही कीं मला संधि मिळे तेव्हां बांचा हात मी आपल्या हातीं घेऊन सारखा दाबत असे. तिलाहि संधि मिळाली कीं तीहि माझा हात पकडून सारखी दाबे. " मुग्ध बालकांच्या लीलांतून उन्मादी प्रणय निर्माण झाला. परंतु पुढचें वैशिष्ठ्य मात्र भव्य दिसून आलें. स्त्रीस्वातंत्र्यास मान्यता देऊन स्त्रीगौरवाचा एक उज्ज्वल आर्य आदर्श महात्माजींनीं आपल्या वैवाहिक जीवनांत निर्माण केला व आपल्या पत्नीलाच ते " बा " म्हणून संबोधूं लागले. पत्नीच्या स्वरूपांत आर्यमातेचा साक्षात्कार पाहाणें यापेक्षां स्त्रीगौरवाची श्रेष्ठ कल्पना अन्य कोणती असूं शकेल ?

× × ×

परंतु पूर्ववयामध्यें महात्माजी एक सामान्य व्यक्तिच होते. आपल्या भविष्याचें त्यांना स्वतःलाही भान नव्हतें. बाहि देवी नव्हत्या, त्या एक सामान्य सन्नारीच होत्या. विवाहकालीं घेतलेल्या शपथांचा अर्थ दोघांनाही माहीत नव्हता, पण हिंदु कुटुंबपद्धतींत पत्नीचें जीवन स्वाभाविकपणेंच पतीच्या जीवनांत ओतप्रोत होऊन जातें, तसें त्यांचेंहि झालें. गृहिणी, सचीव व सखी या तीन्ही भूमिकांवरून त्यांनीं आपल्या पतीला साहाय्य केलें. संकटसमयीं पतिसमवेत सतत राहिल्या. पतीच्या गूढ चिंतेंत त्यांनीं किती भाग घेतला तें सांगतां येत नाहीं. पतीच्या कठीण व्रतांत त्यांनीं सक्रिय साहाय्य नेहमीं केलें नसलें तरी त्या विघ्नरूप कधींही झाल्या नाहींत. तपस्व्याचें जीवन अधिकाधिक प्रखर होत गेलें तसतशी सतीची कोमलता, भावपरायणता व पतिव्रता वाढत गेली,

पतीप्रमाणें आंतरिक द्वंद्वाचे प्रसंग त्यांच्या जीवनांत कधीं आलेच नसावेत, हिंदु पत्नीची पापभीरुता आणि धर्मपरायणता प्रसिद्धच आहे. हिंदु समाजपद्धतींत स्त्रियांना घराबाहेर स्वतंत्र संचार करण्याचा प्रसंगच येत नाहीं, तरी देखील महात्माजींचें जीवन सार्वजनिक होतांच बांनाही बाहेरील वातावरणांत प्रवेश करण्याचे प्रसंग येत गेले. परंतु बांचें चारित्र्य-तेज नेहमीं उज्ज्वल व निष्कलंक राहिलें. आश्रमीय वातावरणांत कुमार-कुमारिकांपासून विवाहित दांपत्यांपर्यंत सर्वांना ब्रह्मचर्याची दीक्षा देण्याचे जे तारक प्रयोग महात्माजींनीं केले, त्यांचें गांभीर्य व मर्यादा टिकविण्यांत या धर्मपरायण, वत्सल आणि पवित्र स्त्रीचें साहचर्य शुभंकर ठरलें.

× × ×

संसारी दृष्टीनें पहातां महात्माजींनीं केलेला प्रपंचत्याग हा बांच्या जीवनांतील एक करुण प्रसंगच होय. आश्रमांत त्यांचें माझें जें पहिलें विश्रब्ध बोलणें झालें, त्यांत त्यांनीं आपल्या पतीविरुद्ध कांहीं गोड तक्रारी मजजवळ केल्या होत्या. परंतु तपस्व्यानें आपल्या त्यागानें मिळविलेलें अमृत आपल्या पत्नीला दिलें तेव्हां त्यागाच्या दुःखाचें परिमार्जन झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या अमृताचें पान करूनच त्या आपल्या पतीच्या सर्वलोकहितकारी जीवनांत लायक सहभागिनी होऊं शकल्या.

परंतु त्यांच्या मनांत स्वतःच्या पतीच्या गौरवाबद्दल किंवा आपल्या दर्जाबद्दल गर्व नव्हता. आश्रमांत त्या इतर स्त्रियाप्रमाणेंच मर्यादेनें वागत. कोणास कसलाच हुकूम करीत नसत.

महात्माजींच्या निवासासमोरील बगीचा आठवड्यांतून एकदां झाडून साफ करण्याचें काम कांहीं काळ मजकडे होतें. एका पावसाळ्यांत बांचा तेथें मुक्काम असतांना एकेसमयीं रात्रभर खूप मुसळधार पाऊस पडला होता. पाण्यानें सर्व बगीचा साफ धुवून निघाला होता व जमीन ओली झाली होती. मी बांच्या उपस्थितींत म्हटलें, " आज सफाईची गरज दिसत

नाहीं. नाहीं बगीचा झाडला तर चालण्यासारखें आहे असें तुम्हांस नाहीं का वाटत ? " बांनीं क्षणभर मौन धरलें, नंतर मान वर करून मजकडे पहात म्हणाल्या, " तुमच्या बापूजींचा बगीचा स्वच्छ रहावा असें तुम्हांला वाटत असेल तर सफाई करा."

चरित्रकार बांची जन्म तारीख व वय यांबद्दल वाद घालीत बसतील, बा महात्माजींपेक्षां वडील कीं लहान या प्रश्नावर वादळ उठेल. परंतु बांना आपण महात्माजींपेक्षां वडील आहोंत असें कोणीं म्हटलेलें खपत नसे. एकदां महात्माजींच्या जन्मदिवसाचा उल्लेख मीं महात्माजींजवळ केला तेव्हां ते सहज बांकडे वळून म्हणाले, " बा, तुझाहि वाढ दिवस माझ्या पूर्वीच होऊन गेला असेल, नाहीं ? तूं मजपेक्षां लहान कीं वडील ? " बा क्षुब्ध होऊन म्हणाल्या, " छे: हो ! माझा वाढदिवस गेला नाहीं अजून. मी तुमच्यापेक्षां दोन महिन्यांनीं लहान आहे. " " काय, तूं मजपेक्षां मोठी नाहींस ? " महात्माजींनीं विचारलें. " मुळींच नाहीं, " बा जोरानें म्हणाल्या, " कोण म्हणतें तसें ? मी तुमच्याहून लहानच आहे. "

बा प्रत्युत्पन्नमति होत्या. गांधी कुटुंबानें काठेवाडांतील संस्थानिकांच्या सेवेंत कांहीं पिढ्या घालविल्या आहेत. त्यामुळें गांधीकुटुंबांतील पुरुषांतच-नव्हें तर स्त्रियांतहि मुत्सद्देगिरी व हजरजबाबीपणा भरपूर आहे. बांच्या दर्शनास व भेटीस येणाऱ्या व त्यांचें साहचर्य लाभलेल्या सर्व स्त्रीपुरुषांस बांच्या अंगच्या या चातुर्यशक्तीचा प्रत्यय वारंवार येत असे.

१९३१ सालचे दिवस. साबरमती येथील आश्रमांत सायंभोजन चालू होतें. मी भोजन आटपून जिन्याच्या पायऱ्या उतरून खालीं आलें तों आश्रम पहाण्यास आलेल्या कांहीं शीख लोकांची एक टोळी दिसली. त्यांनीं युरोपियन पोशाख घातला होता व डोक्यांवर फेटे होते. त्यावेळीं महात्माजी आश्रमांत नव्हते. बा रसोड्यांत होत्या. " माताजींचें दर्शन घ्यावयाचें आहे, त्यांना जरा कळवाल काय ? " असें ते शीख मला

म. ग्रं. सं. ठाणे.

विचारूं लागले. **बां**ना उपचार आवडत नसत व 'दर्शन' देणेंहि त्यांना पसंत नसे. विशेषतः त्या कामांत असल्या म्हणजे तर त्यांच्याकडे असल्या गोष्टी बोलण्याची सोय नव्हती. मीं त्यांना ही गोष्ट समजावून सांगितली, पण ते आग्रहच धरून बसले. शेवटीं मी हिंमत धरून आंत **बां**कडे गेलें व दर्शनोत्सुक जनांची विनंति त्यांच्या कानांवर घातली. प्रथम **बा** बाहेर येण्यास कबूल होईनात. पण मीं आग्रहच केला: "**बा**, ते लोक फार दुरून आले आहेत. द्या ना दर्शन!" तावडतोब **बा** आपल्या स्वाभाविक द्रुतगतीनें (वृद्ध वयांत सुद्धां **बा** फार चपळ होत्या, आणि त्यांच्या भावना कांहीं कारणांनीं क्षुब्ध झाल्या कीं त्यांच्या गतीला विशेषच वेग मिळे) पावलें टाकीत बाहेर आल्या. दर्शनोत्सुक लोक मोठ्या भाविकपणें त्यांच्या चरणीं लीन झाले. "माताजी, आपल्या दर्शनासाठीं आलों, फार आनंद वाटला'—" परंतु त्यांस पुढें बोलूं न देतां **बा** जरा तीव्र स्वरानें म्हणाल्या, "माझ्या दर्शनासाठीं आलांत तर हा विलायती पोशाख घालून कां आलांत? मजकडे यायचें तर खादी नेसून आलें पाहिजे. विलायती कपडे घालावयाचे असतील तर साहेबलोकांच्या दर्शनाला जा." शेंकडो व्याख्यानांनीं जो परिणाम झाला नसता तो **बां**च्या या चार शब्दांनीं झाला. ते लोक अगदीं शरमिंदे झाले.

* * *

महात्माजी **बां**ची खूप कदर करीत असत. अनुभवान्तीं मला दिसून आलें कीं महात्माजींचें जीवन कितीहि सार्वजनिक झालें तरी **बां**चा पत्नी या नात्यानें त्यांच्यावरील अधिकार कमी झालाच नव्हता.

यांच्या निर्णयांना ते मान देत. त्यांची प्रतिष्ठा ते बाळगून असत. महात्माजींचें कांतणें फार होत नसे व त्यांच्या सुतावर पुष्कळ जणांच्या उड्या असत. १९३० च्या सत्याग्रहकालांत महात्माजींनीं, कांतणाऱ्यांनीं आपलें सूत आश्रमजमा करून आश्रमानें दिलेलें कापड, जाड-ओबड धोबड कसलेंहि असलें तरी, सर्वांनीं घेतलें पाहिजे असा नियम केला होता. म्हणजे व्यक्तीचे श्रम सामुदायिक मालकीचे करण्याची ती कल्पना होती. पुढें महात्माजी तुरुंगांत गेल्यावर त्यांना कांतण्यास बराच वेळ मिळूं लागला. त्या वेळीं महात्माजींच्या आश्रमांत राहिलेल्या वस्तु व तुरुंगांतून त्यांचेकडून येणारें सूत, पुस्तकें वगैरेंची व्यवस्था ठेवण्याचें काम मजकडे होतें. बा सत्याग्रहचळवळींत सामील झाल्या होत्या, म्हणून त्यांचें आश्रमांत राहाणें क्वचितच होई. एकदां त्या आश्रमांत आल्या असतां मजकडे येऊन म्हणाल्या, "प्रेमाबेन, बापूजींचें सूत तुमच्याकडे आहे असें मी ऐकतें." "होय," मीं उत्तर दिलें.

"त्याचें तुम्ही काय करणार आहां? आश्रमाला देऊन टाकणार आहां का?"

"कां बरें?"

"हें पहा, माझ्या साड्या फाटत चालल्या आहेत. मला नव्या हव्या. माझं सूत जाड निघतं. बापूजींचं बारीक निघतं. मला त्याच्या साड्या माफक होतील. पण त्यांनीं तर सारं सूत प्रत्येकानं आश्रमास दिलं पाहिजे असा नियम केला आहे. मग माझं कसं व्हावं?"

"तुम्ही काळजी करूं नका. महात्माजींचं सूत तुम्हांलाच मिळालं पाहिजे." मीं जोरानें म्हटलें. "मी लिहितें महात्माजींना. त्यांच्या सुतावर तुमचाच हक्क आहे हें त्यांना कळायला नको काय?"

" हो. पण तें त्यांना कोणीं सांगावं? त्यांच्या सुतावर साऱ्यांच्याच उड्या असतात. मला मुळींच मिळत नाहीं. आतां तुम्ही कळवाल तर."

मीं महात्माजींना पत्र लिहून कळविलें कीं बानीं तुमच्यासाठीं फकीरी घेतलीच आहे पण त्यांच्या अन्नवस्त्रांच्या गरजा पुरवून घेण्यापुरता तरी त्यांचा तुमच्यावर हक्क आहे आणि तुमचें सूत त्यांना दिलें तर आश्रमनियमांना बाध येईलसें मला वाटत नाहीं.

लगेच तुरुंगांतून महात्माजींचें उत्तर आलें. " माझ्या सुताच्या साड्या विणवून घेतल्याच पाहिजेत. मीं सुताविषयीं माझे विचार दर्शविले तत्पूर्वीचें तें सूत आहे. खरें पाहतां बा च्या साठींच तें राखलें आहे. तेव्हां त्याचा त्याग बानंच करावयाचा आहे. मला करावयाचा नाहीं. बा फार जाड साड्या वापरूं शकतच नाहीं; तेव्हां आश्रमाकडून देखील सामान्यपणें बारीक साड्याच मिळावयाच्या. अशा रीतीनें देखील माझ्या सुताची साडी बा खुशाल वापरो. यानंतरच्या सुताविषयीं मात्र कडकपणा धारण केला पाहिजे. पण तेथें देखील मी बावर जबरदस्ती करणार नाहीं. बानं स्वेच्छेनं त्याचा त्याग करावा आणि तिच्या वांट्याला जें येईल त्यानं संतुष्ट राहावं अशी माझी इच्छा आहे."

* * *

महात्माजी सत्यशोधनाच्या मागें लागले होते. बांचा परमेश्वर पतींतच ओतप्रोत होता. बालपणींचीं मुग्ध वर्षें परंपरागत संस्कार स्वीकारण्यांत गेलीं. तेराव्या वर्षीं विवाह होतांच अल्लड पण हट्टी

सोबत्याशीं बरोबरीनें खेळण्यांत, भांडण्यांत व प्रेम करण्यांत पुढील पांच वर्षें गेलीं. महात्माजींच्या विलायतगमनानंतर यांना कांहीं थोडा विराम मिळाल्यास मिळाला असेल. परंतु त्यांच्या खासगी उद्गारांवरून असें दिसतें कीं महात्माजी पाश्चात्य फॅशनचे भोक्ते होऊं लागले होते व यांस आवडत नसे तरी देखील त्यांच्यावर पोशाखांत सुधारणा करावयाच्या बाबतींत सक्ती करीत. परंतु यांत वृद्धपणीं सुद्धां जी एक नीटनेटकेपणाची, स्वच्छतेची व टापटीपीची आवड दिसून येत होती, ती अंगचीच असावी असें वाटतें. जरी यांना शाळा-कॉलेजचें शिक्षण मिळालें नाहीं तरी त्यांची स्मरणशक्ति तीव्र असे. राजकारणांतहि त्यांची ग्रहणशक्ति आश्चर्यजनक होती. मोठमोठ्या सभांत हजर राहून परत आल्यावर त्या तेथील वक्त्यांच्या व्याख्यानांतील मुद्द्यांचा अहवाल मजकडे बिनचूक देत व आपली टीका ऐकवीत, तेव्हां त्यांचा मुद्देसूदपणा, कुशाग्रबुद्धि आणि स्मरणशक्ति पाहून मला विस्मय वाटे. खुद्द त्यांनाहि सभेंत व्याख्यान देण्याचें आमंत्रण येई. या वेळीं मी जवळ असल्यास प्रथम मजजवळ येऊन त्या विषयाची माहिती त्या समजावून घेत, मुद्दे काढीत व नंतर सभेंत अस्खलित बोलून सर्व मुद्दे व्यवस्थित व न चुकतां सभेपुढें मांडीत. त्यांची बसण्याची व बोलण्याची ढब मोटी डौलदार असे. आपल्या प्रौढप्रतापी व्यक्तिमत्त्वानें व हालचालीनें त्या सर्वांवर विलक्षण छाप पाडीत. त्यांच्या नम्र, शांत आणि सात्विक मुखमंडलावर पसरलेलें आत्मगौरवाचें तेज केव्हांहि विलुप्त झालें नाहीं. सभेंत वेळ 'मारून न्यावी' अशीहि त्यांची भावना नसे पण त्यांच्या निर्व्याजतेची शक्ति इतकी अद्भुत होती व आपल्या तोंडून व्यर्थ वचन निघूं नये याबद्दल त्यांचा आग्रह इतका हृदयस्पर्शी

असे कीं कधीं कधीं आम्हां शेजारच्या मंडळींवर विलक्षण प्रसंग गुदरत. एकदां बिहारमध्यें एके ठिकाणीं महिला-परिषद भरली असतां बा मुख्य पाहुण्या व वक्त्या होत्या. सोबत राजकुमारी अमृतकुँवर, श्री. सुचेतादेवी वगैरे बऱ्याच कार्यकर्त्याहि होत्या. बांनीं सभेपूर्वीं मजजवळ मुद्द्यांची चर्चा यथासांग केली. सभेंत विलक्षण गर्दी होती व बांच्या भोंवतीं तर बड्या स्त्रियांचा -स्थानिक व पाहुण्या यांचा- वेढाच होता. मी त्यांचेपासून जरा दूर होतें. बांनीं आपलें व्याख्यान मुद्देसूदपणें दिलें. परंतु संपल्यानंतर त्यांनाच अस्वस्थता वाटली असावी. बसल्या जागेवरून गर्दीतून मान वर काढून त्या मोठ्यानें मला विचारूं लागल्या, " बेन, मीं सारे मुद्दे बरोबर सांगितले कीं आणखी कांहीं बाकी राहिले? व्याख्यान ठीक झालें कां?" आपल्या या प्रश्नाचा परिणाम शेजारीं बसलेल्या मोठमोठ्या स्त्रियांच्या मनावर काय होईल याची त्यांना जराहि क्षिति वाटत असलेली दिसली नाहीं.

*　　*　　*

महात्माजी तपस्वी झाले तरी त्यांनीं संसाराचा त्याग केला नाहीं. आपल्या श्रेष्ठ जीवनांतहि त्यांनीं बांना आपली सहचरी बनविण्याचा प्रयत्न केला. आपल्या सार्वजनिक जबाबदाऱ्यांत त्यांना सहभागी बनविलें. बांनीं महात्माजींकडून उच्च जीवनाची दीक्षा मिळविली नव्हती, घेतली होती. त्यामुळेंच पतिसमवेत असतां किंवा दूर असतां, आश्रमांत असतां किंवा तुरुंगांत असतां, त्या आपले शुभ संस्कार सर्वत्र प्रकट करीत. विशेषकरून आजाऱ्यांची सेवा करण्याची कला महात्माजींकडून त्यांनीं उचलली होती. आपल्या वडीलकी-

च्या नात्यास अनुसरून त्यांनीं सर्वांचा आणि आजाऱ्यांचा परामर्श घेण्याचें केव्हांच टाळलें नाहीं. तुरुंगांत असतांना सुद्धां त्या हें कार्य मन लावून करीत.

आपल्या लोकहितकारी जीवनाची दीक्षा बांस देतांना कराव्या लागलेल्या कित्येक प्रयोगांचें वर्णन महात्माजींनीं आपल्या आत्मकथेंत दिलें आहे. अस्पृश्य व विधर्मी लोकांस घरांत ठेवून घेणें, त्यांची सेवा करणें, चेंबरपॉट साफ करणें, लोकांनीं त्यांस दिलेल्या द्रव्य-अलंकारांच्या भेटी सार्वजनिक कार्यास अर्पण करणें, आश्रमीय जीवन व्यतीत करणें वगैरे अनेक संस्कार त्यांना देत असतांना किती करुण-कठोर प्रसंगांतून स्वतःस व बांस जावें लागलें त्याचें रसिक वर्णन महात्माजींनीं जागोजाग केलें आहे. इतक्या वर्षांच्या निकट सहवासानंतरहि म्हणतां येईल कीं जी दीक्षा बांनीं घेतली ती त्यांची प्रकृति बनली. परंतु कित्येक गोष्टी केवळ त्यांना स्पर्श करून गेल्या. आपले जुने कौटुंबिक परंपरागत संस्कार त्यांच्यांत दृढ होते म्हणूनच कुटुंबांतील गरीब नातलगांना त्या मधून मधून द्रव्यसाहाय्य करीत व तेवढ्यासाठीं लोकांनीं भेटीदाखल दिलेले पैसे त्यांनीं ठेवून घेतले होते. स्वतःसाठीं नव्हे, तर सुनांसाठीं उपयोग होईल म्हणून भेटींतील अलंकार बाळगून ठेवण्याचा त्यांचा आग्रह होता. महात्माजींच्या अस्वाद व्रताचें परिशीलन, अनुकरण व आत्मीकरण त्या शेवटपर्यंत करूं शकल्या नाहींत. यामुळें कधीं कधीं पतिपत्नींत जीवनतापी गजग्राह चाले. परंतु महात्माजींत भावनांच्या उत्कटतेइतकीच कोमलता व सर्वसंग्राहक उदारता असल्यामुळें आणि बांनीं त्यांच्यासाठीं केलेली कुर्बानीहि विशेष असल्यामुळें बांचे पंख जरी जीवनाकाशांत

फार उंच भरारी मारूं शकले नाहींत तरी त्यांचें साहचर्य महात्माजींना उन्नतिपोषकच ठरलें.

इतिहासप्रसिद्ध दांडीकूचच्या वेळीं, "स्वराज्य घेतल्याशिवाय मागें फिरणार नाहीं" अशा प्रतिज्ञेनें महात्माजींनीं आपलीं करुणापेलव पावलें पुढें टाकलीं त्या वेळीं, या जीवनमरणाच्या झगड्याचा अंत कसा काय होणार अशी अज्ञात शंका सर्वांच्या हृदयांत व्यापून राहिली असतांना, एका हातांत काठी व दुसरा हात बांच्या खांद्यावर टाकून आश्रमांतून कायमचे बाहेर पडलेले महात्माजी, स्थिर पावलें टाकीत, बांचें सांत्वन करीत जाणारे महात्माजी अजून आठवतात. कांहीं अंतर त्यांच्या बरोबर चालून गेल्यावर महात्माजींच्या अनुज्ञेनें त्यांना सोडून बा परत वळल्या. त्यांच्या मुखावर शोकान्तिका पसरली होती. नेत्रांत अश्रु होते. "हल्लीं अनवाणी चालण्याची त्यांना संवय नाहीं, बेन. बाहेर चपला नि घरांत खडावा पायांत असल्याच पाहिजेत. पण आतां नुसत्याच चपला घालून गेले आहेत. खडावा नसल्यावर त्यांचें कसें होईल? ईश्वर जाणे!" दीर्घ निश्वास टाकीत बांनीं मजजवळ उद्गार काढले. सतीला पतीच्या चरणयुगुलांचीच चिंता वाटणार!

* * *

त्यांच्या पतीशीं असलेल्या अविनाभावाची कदर सरकार सुद्धां किती दक्षतेनें करीत असे त्याचा दाखला म्हणजे महात्माजींच्या प्रत्येक उपवासाच्या वेळीं त्यानें बांना महात्माजींच्या सहवासांत नेऊन ठेवलें हाच होय. या उपवासाच्या वेळीं बांचा सहवास खरोखरच महात्माजींना ग्रीष्मकालांतील छायेप्रमाणें वाटत असला पाहिजे. महा-

त्माजींवर प्रेम करणारे लाखों आहेत. परंतु त्यांचें प्रेम त्यांना मंदिराच्या द्वारापर्यंतच नेऊन ईश्वराचें दर्शन करवितें. केवळ सतीचें प्रेमच आंतील गाभाऱ्यापर्यंत पोंचूं शकतें.

१९३३ सालांत साबरमतीच्या तुरुंगांत बांबरोबर राहाण्याची संधि मला मिळाली होती. आम्हांस सजा झाली आणि लगेच महात्माजींनीं येरवड्यांत उपवास सुरू केल्याची बातमी आली. तो त्यांचा तुरुंगांतील तिसरा उपवास होय. बांनीं अन्न सोडलें. त्यांच्या जीवाला दुःखाचा स्पर्श होऊन चुकला होता तरी चेहरा शान्त होता. डोळ्यांत करुणा दिसे काय ती. सुपरिंटेंडंट येऊन विचारूं लागले, "माजी, उपवास करूं नका, कांहीं तरी खा." बा अगत्यानें म्हणाल्या, "होय, मी दहीं घेतें." सुपरिंटेंडंट मीराबेनला म्हणूं लागले, "यांना समजावा. यांची प्रकृति ठीक नाहीं. वार्धक्यहि आहे. यांनीं साहस करूं नये." मीराबेन म्हणाल्या, "या प्रसंगीं कोणीं काय व कसें सांगावें?" बा एका दिव्यांतून जात होत्या पण त्यांनीं बाहेरून विषाद दाखविला नाहीं. एखाद्या योगिनीप्रमाणें त्या अचल दिसत होत्या. जणुं त्या प्रेमच अनुभवीत होत्या. त्यांतून उद्भवणाऱ्या हर्षविषादाचा संपर्क त्यांना लागत नव्हता. त्यांच्या डोळ्यांत मीं अश्रुहि पाहिले नाहींत. सायंकाल होतांच मात्र त्यांनीं दिवा लावला व हात जोडून डोळे मिटून त्या प्रार्थना करूं लागल्या. मी पाठीशीं उभी होतें. सारे शब्द मला आठवत नाहींत. "— हे गंगामाता, हे परमात्मा" असे आळवून म्हटलेले शब्द मला आठवतात. त्यांनीं एकाएकीं मागें वळून मजकडे पाहिलें, जणुं आपण एकांतांत नाहीं याचें स्मरण

त्यांना झालें असावें. नंतर त्या गोड हंसल्या ! वेदनेला प्रेमाचा स्पर्श झाला व तिचें रूपांतर हास्यांत झालें !

*  *  *

**बा** राजकोटच्या तुरुंगांत असतांना महात्माजींनीं बाहेर उपवास सुरू केला. परंतु "मृदूनि कुसुमादपि" हृदयाच्या **बांनीं** "वज्रादपि कठोर" होऊन सरकारची सवलत घेऊन महात्माजींचें सांनिध्य मिळविणें नाकारलें. राजकोटसमयीं खुशीनें तुरुंगांत जाणाऱ्या **बा** १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे वेळीं महात्माजींना सोडून तुरुंगांत जाण्यास कबूल झाल्या नाहींत. महात्माजींच्या प्रकृतीची त्यांना चिंता वाटेच. परंतु पुढें पुढें योग्याच्या कठोर तपाची त्यांना धास्ती वाटूं लागली होती. व्याधि आणि साधना यांपैकीं कोणाचा पहिला हल्ला आपल्या पतीवर होईल याच्या विवंचनेंत त्या असत. त्यांनीं या परिस्थितींत महात्माजींस सोडून जाण्याचें नाकबूल केलें. खुद्द **बांची** प्रकृतिहि ढांसळत चालली होती. साठांपेक्षां अधिक वर्षें त्यांनीं ज्या मार्गाचें अव्याहत आक्रमण केलें तो प्रेमपंथ त्यांस पावकाच्या ज्वाळेप्रमाणें भाजून टाकीत आला होता. महात्माजींनीं सतीला स्वतःपासून दूर ठेविलें नाहीं.

*  *  *

एके दिवशीं दुपारीं सेवाग्रामांतील महात्माजींच्या झोंपडींत आम्ही बसलों होतों. महात्माजी पहुडले होते. त्यांच्या पायास तूप चोळलें जात होतें. **बा** जवळच भिंतीशीं बसल्या होत्या. सूर्यानें

आपल्या सहस्रजिव्हा बाहेर काढल्या होत्या. आसमंतात् उन्हाचें साम्राज्य चालू होतें. पण लोकमित्र सुखकारी पवन उन्हांतूनहि प्रवास करीत होता. आम्ही चार मंडळी महात्माजींभोंवतीं गोळा होऊन हास्यविनोद करीत होतों.

मीं म्हटलें, " ऐकलंत महात्माजी, नुकतंच एका मराठी मासिकांत ज्योतिष्यानं ज्योतिष वर्तविलं आहे — येत्या एप्रिलमध्यें तुम्हांला भार्यावियोग आहे म्हणून. " तो महिना फेब्रुवारीचा असावा.

" खरं कां ? " महात्माजी वर मान करून म्हणाले. नंतर बांस उद्देशून म्हणाले, " काय बा ? तूं मरणार ? खरोखरच तूं मला टाकून जाणार ? "

बांनीं उत्तर दिलें, " असेल नशीबांत मरण तर कुणाच्यानं टळतं कां ? जायचं असेल तर जावंच लागेल. "

" तें नाहीं चालणार. तूं गेलीस तर माझं कसं होईल ? मला सोडून तुला जातां कामा नये. " महात्माजी म्हणाले.

" भलतंच कांहीं तरी, " बा खरोखरीच्याच गंभीर होऊन बोलूं लागल्या, " तुमचं काय व्हायचं ! तुम्हीं आनंदानं राहावं, मुलांबाळांना सांभाळावं, म्हणावं बा गेली तरी मी तुम्हांला आहेंच. तेव्हां दुःख करूं नका. " बा निरवानिरवीच्या गोष्टी बोलूं लागल्या.

" तें मला मुळींच कबूल नाहीं. माझ्या अगोदर तूं मरतां कामा नये. मरायचंच असेल तर, चल, मी तुला माझ्या अगोदर फक्त अर्धा तास मरायची परवानगी देतों. बस्स्, माझ्या अगोदर फक्त अर्धा तास तूं मरावंस, मग मी मरेन. " नंतर किंचित्काल थांबून आपल्याच नादांत ते पुढें म्हणतात, " अहाहा ! आणि तुझ्यानंतर अर्ध्या

तासानं मी मेलों म्हणजे लोक म्हणतील, काय प्रेम हो या वृद्ध दंपतीचं !! म्हातारी गेल्यावर अर्धा तास सुद्धां म्हाताऱ्याच्यानं राहवलं नाहीं ! किती उत्कट प्रेम !! " असें म्हणून आपल्याच कल्पनेनें रंगून महात्माजी मोठ्यानें हंसले. बा बिचाऱ्या स्तिमित होऊन हा स्फोट पहातच राहिल्या !!

* * *

पण ईश्वरी कृपेनें भार्यावियोगाचा प्रसंग तेव्हां आला नाहीं. दिवसांमागून दिवस गेले व महिन्यांमागून महिने गेले. सतीच्या त्यागाची पार्श्वभूमि अधिक उज्ज्वल दिसावी, तिचें अखेरचें बलिदान जगांतील कवींच्या काव्याचा विषय व्हावें, त्यांच्या रुग्णमूर्तींत भारत-मातेची दुःखसंतप्त मूर्ति प्रकट व्हावी अशीहि ईश्वराची इच्छा असेल. कसेंहि असो ; सतीनें आणखी कांहीं काल पतीला साथ दिली.

* * *

९ ऑगस्ट १९४२ ची सकाळ ! पुढाऱ्यांच्या सार्वत्रिक पकडापकडीची खबर वाऱ्यासारखी मुंबई शहरांत फैलावली. मी धावत बिर्लाहाउसमध्यें गेलें. महात्माजींना नेऊन अर्धा-पाऊण तास झाला होता. सर्वत्र आशंका, विस्मय व उद्वेग यांचें वातावरण पसरलें होतें. कोणीच भानावर नव्हतें. कोण काय बोलतें तिकडे कोणाचेंच धड लक्ष नव्हतें. प्रत्येकजण कांहीं तरी संबद्ध व असंबद्ध बोलत होतें. मनांतील भावनातरंग उंचावरून शिलाखंडावर उडी घेणाऱ्या जलौघाच्या तुषारांसारखे अनिर्बंध शब्दरूपांनीं बाहेर पडत होते.

मीं श्री. अम्तुल सलामबेनना विचारलें, " बा कोठें आहेत ?" त्या समग्र कोलाहलांत बा दिसत नव्हत्या.

" बा स्नानगृहांत आहेत. " त्यांनीं उत्तर दिलें. मला बांना भेटावयाचें होतें म्हणून त्या बाहेर येण्याची मीं थोडा वेळ वाट पाहिली.

" त्या लौकर बाहेर येणार नाहींत. त्यांच्या अंगाला तेलमर्दन करीत आहेत. " कोणी तरी म्हणालें.

मला परत जाण्याची घाई होती. तरी सुद्धां त्या वत्सल व पवित्र मातेचें दर्शन घेतल्याशिवाय पाय निघेनात. कोणाला ठाऊक पुढें काय होणार ? आम्ही मंडळी अज्ञात भविष्याच्या काळ्या पडद्यामागें कोठें दडली जाऊं ईश्वर जाणे ! असा विचार मनांत येऊन मीं स्नानगृहाकडे मोर्चा फिरविला !

" बा, बा, मला तुम्हांला भेटावयाचें आहे. " मीं म्हटलें.

" या आंत. " बांचा कोमल आवाज ऐकूं आला. मी दार उघडून आंत गेलें. बांची जर्जर व कृश तनुलता दृष्टीस पडली. मुखावर तेंच वत्सल व गोड हास्य !

" बा, तुम्ही आतां काय करणार ? महात्माजी गेले तरी त्यांच्या जागेवर तुम्ही अधिष्ठित आहां. तुम्ही आज संध्याकाळीं दादरला जाऊन सभेंत आपला संदेश सांगितला पाहिजे. सर्व देशालाहि संदेश पाठवा. आतां तुम्हीच आमच्या पुढारी ! " मी झरझर असें कांहीं बोलून गेल्याचें आठवतें.

त्या वत्सल मातेच्या हृदयांत युद्धाचा क्षोभ दिसून आला नाहीं. आम्हां मंडळीवर त्याची धुंदी होती. परंतु सती एकच जाणत होती. पतीचें कार्य !

२६३४

" असें करूं म्हणतां ? मी दादरला जाईन म्हणतें. बापूजी-च्या ऐवजीं मीच बोलेन. " अशा अर्थाचे कांहीं शब्द त्यांनीं काढले.

तेंच त्या माउलीचें शेवटचें दर्शन मला झालें ! दीड वर्षांनीं ती मूर्ति स्मृतिशेष होईल अशी कल्पना तेव्हां मला नव्हती. परंतु अज्ञाताबद्दल मनांत अगदींच विचार नव्हता असेंहि नाहीं. ती आशंका होती म्हणून तर तें शेवटचें दर्शन घेण्याची त्वरा मीं केली.

*  *  *

आम्ही तुरुंगांत असतां महात्माजींच्या एकवीस दिवसांच्या उपवासानंतर बांच्या अस्वास्थ्याची खबर आम्हांस मिळाली. " महात्माजींच्या आश्रमीय भगिनींपैकीं जितक्या भगिनी येरवड्याच्या तुरुंगांत स्थानबद्ध असतील त्यांचीं नांवें पाठविण्यास सरकारचा हुकूम आला. बांच्या सुश्रूषेसाठीं स्त्रीसेविकेची जरूरी होती. श्री. मणीबेन पटेल यांचें व माझें याप्रमाणें दोन नांवें पाठविण्यांत आलीं. मणीबेनना महात्माजींजवळ ठेवण्यास त्यांच्या वडिलांशीं होत असलेला त्यांचा पत्रव्यवहार आड आला. मला कां नकार देण्यांत आला, तें सरकारला ठाऊक. परंतु अंत्यसमयीं बांची सेवा करण्याची संधि मिळण्याचें भाग्य माझें नव्हतें.

बांचा आजार गेल्या डिसेंबरपासून जाहीर झाला. त्यानंतरच्या घटना जनतेच्या डोळ्यासमोर ताज्या आहेत. बांना आपला अंत्य-समय नजीक आलेला कळून चुकला पाहिजे. त्यांना बाहेर जाण्याची परवानगी मिळाली असती. परंतु अशा समयीं पतीपासून दूर जाण्याची इच्छा कोणती सती करील? मुक्तीनंतर त्या साफ बऱ्या झाल्या असत्या

अशी खात्री नव्हतीच. एकदां बाहेर गेल्यावर सरकार त्यांना पुन्हां पतीजवळ जाऊं देण्यास राजी झालें नसतें. त्यांनीं पतिचरणाजवळ आत्मोत्सर्ग करण्याचें सतीचें वाण पतकरिलें !

बांच्या अखेर समयींच्या आजाराचें साद्यंत वर्णन श्री. देवदास गांधी यांनीं आपल्या २८ फेब्रुवारीच्या पत्रकांत केलें आहे. " स्थानबद्धतेचे क्लेश सहन करण्याची बांची शारीरिक व मानसिक ताकद पुरती नव्हती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या पूर्वीं दीर्घ मुदतीचा कारावास त्यांनीं भोगला होता. खास करून राजकोट संस्थानांतील एका खेड्यांत त्यांना एकांत कारावास भोगावा लागला तेव्हां तर सारा कारभार आटोपण्याचीच वेळ जवळ आली होती. तरी सुद्धां हा शेवटचा कारावास अतिशयच कसोटीचा गेला; असा अन्य कोणताहि गेला नव्हता. शरीर व मन दोन्ही जर्जर झालीं होतीं. त्या इमारतीचा प्रचंडपणा आणि एकंदर वातावरण त्यांच्या सरावाच्या विरुद्ध होतीं. कांटेरी तारांचें कुंपण आणि संत्री यांनीं कळस केला ! गेल्या वर्षीं त्या मजकडे म्हणाल्या होत्या, ' सेवाग्रामच्या छोट्या झोंपड्यांत पुन्हां जाऊन राहाण्यासाठीं जिवाला तगमग सुटली आहे. ' ती तगमग शेवटपर्यंत कायम होती असें मीं जाहीर म्हटल्यास माझ्या मातेच्या स्मृतीला मीं अन्याय करीनसें मला वाटत नाहीं. "

अनिश्चित काळापर्यंत स्थानबद्धतेची कल्पना त्यांच्या मनावर जड दडपणाप्रमाणें होऊन बसली होती. त्यांच्यासाठीं करण्यांत आलेल्या सुखसोयींनीं त्यांना शांति मिळाली नाहीं. आपणांप्रमाणेंच हजारों लोक, त्यांपैकीं कित्येक त्यांच्या निकट परिचयाचे, असेंच

दुःख भोगीत आहेत ही कल्पना त्यांना अधिकच जाचत गेली आणि गेल्या दीड वर्षांत त्यांनीं ज्या ज्या हेतूंनीं प्रेरित होऊन प्रार्थना केली त्यांपैकीं एक म्हणजे सर्वांना सुटण्याची सवलत मिळत असेल तर आपण व बापू यांना कायम स्थानबद्ध करून ठेवलें तरी चालेल हा होता.

२० फेब्रुवारीला मुंबईसरकारचें पत्रक निघालें: "श्रीमती गांधी यांची प्रकृति गेल्या कित्येक दिवसांत ढांसळत आहे आणि आतां फारच गंभीर झाली आहे." दुसऱ्या दिवशींहि तीच परिस्थिति राहिली आणि हिंदुस्थानसरकारच्या हुकुमानें कलकत्त्याहून 'पेनिसिलीन' औषध विमानमार्गें आणविण्याची व्यवस्था झाली.

महाशिवरात्रीचा दिवस उजाडला. शिवतर्पण करण्याचा तो मंगल दिवस होता. जणुं बांच्या पुण्यपावन आत्म्यानें त्या दिवशीं प्रयाण करण्याचें ठरविलें असावें. शेवटपर्यंत त्या शुद्धीवर होत्या. तिसरे प्रहरीं श्री. देवदासभाईंना जवळ बोलावून त्यांनीं निरवानिरवीच्या गोष्टी केल्या. "कधीं तरी जायचंच, मग आज कां नको!" त्यांनीं म्हटलें. नंतर त्यांनीं हात जोडून करुण स्वरांत ईश्वराची प्रार्थना केली.

इतक्यांत कलकत्त्याहून रामबाण औषध आलें. देवदासभाई त्याचा प्रयोग बांवर करूं इच्छीत होते; पण महात्माजींनीं त्यांचें निवारण केलें. "बा आतां ईश्वराच्या हातांत आहे, आतां तूं मध्यें पडूं नकोस, आपल्या आईचे हाल करूं नकोस," असें त्यांनीं आपल्या मुलाला बजावलें.

हें संभाषण चालू असतां बांकडून महात्माजींना बोलावणें आलें. मृत्यु-दूत ईश्वरी संदेश घेऊन सन्मुख ठाकला होता. बा महात्माजींचा

निरोप घेऊं इच्छीत होत्या. महात्माजी जवळ आले. सतीला शेवटीं प्रिय पतीच्या स्कंधाचा आधार मिळाला. भोंवतीं ईश्वरभजन चालू आहे, पुण्यश्लोक पतीनें सतीचा विकल देह आपल्या हातांत सांवरून धरला आहे, श्रीशिवाच्या संचाराची सायंकालची वेळ व महाशिवरात्रीचा परम पवित्र दिवस — असा संकेत योजून परमेश्वरानें बांच्या पवित्र आत्म्यास स्वर्गीचें बोलावणें पाठविलें. भारतमातेची साक्षात् प्रतिनिधिच तिच्या पुण्यप्रकोपाचा टाहो ईश्वरचरणीं पोंचविण्यास मृत्युलोकाचा त्याग करून जेथें मरण नाहीं, जरा नाहीं, आधिव्याधि नाहींत किंवा कारावास नाहीं, जेथें पतीची यशःसिद्धिच जणुं मूर्तिमंत वास करून आहे, जेथें सुख-दुःख, जय-पराजय, विषाद-क्लेश यांचा संपर्क नाहीं, विरहाचें नांव नाहीं अशा चरम शांतिनें विराजित दिव्य लोकीं निघून गेली ! शिवरात्रि खरोखर शिवा म्हणजे मंगल रात्रि ठरली !

भारतमातेच्या हजारों कन्या आपापल्या पतींचा, पुत्रकन्यांचा, पिताबंधूंचा विरह भोगीत असतील, संकटें सहन करीत असतील, व्याधींशीं सामना करीत असतील, असह्य क्लेश भोगीत असतील ! सती कस्तूरबांनीं त्या सर्वांसाठीं स्वतःचें बलिदान दिलें. सुमारें वर्षापूर्वीं राष्ट्रपति मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या बेगम मरहूम जुलेखाबिबि यांनीं पतिविरह भोगीत असतांच स्वतःची कुर्बानी केली होती. पूज्य बांनीं पतीच्या संन्निध ईश्वरचरणांचा आश्रय केला. या दोन सतींचें पवित्र बलिदान भारतवर्षाच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील ! त्यांच्या त्यागानें देशाचें यश अधिक उज्ज्वल होईल ! त्यांच्या समाधींतून नवयुगाच्या नेत्री निर्माण होतील !

महात्माजींचे दक्षिण आफ्रिकेंतील इंग्रज सहकारी श्री. पोलक यांच्या पत्नी आपल्या पुस्तकांत बाविषयींच्या आठवणी देतांना लिहितात:- बहुतेक आयांप्रमाणें कस्तूरबाईंना आपल्या मुलांबद्दल अभिमान व उमेदी वाटत. मुलांचे कपडे सुबक असावे असें त्यांना वाटे. घरांत त्यांच्याखेरीज सर्व युरोपियन कपडे वापरीत. एखाद्या मुलाला नवा पोशाख किंवा नवे बूट घेण्याची आवश्ययकता उत्पन्न झाली म्हणजे वारंवार त्या मला सांगत : " you ask Baqu for it. " ( तुम्ही बापूंना तें आणावयास सांगा. ) त्याप्रमाणें मी सांगत असें.

माझे पति व गांधीजी कचेरींत गेले म्हणजे कस्तूरबाई व मी दोघीच घरीं असावयाच्या. लौकरच आम्हीं परस्परांशीं संभाषण करण्याची युक्ति शोधून काढली. थोड्याच काळांत त्यांची इंग्रजी भाषा सुधारली आणि पुढें जेव्हां त्यांची भीड बरीचशी चेपली तेव्हां आम्ही दोघी आमच्या कांहीं थोड्या युरोपियन स्नेह्यांस भेटावयास जाऊं लागलों. त्या समयीं संभाषणांत भाग घेण्यास त्या कचरत नसत.

मि. पोलक एकदां कांहीं कारणावरून गांधीजींवर रागावले होते. कांहीं दिवस त्यांनीं गांधीजींशीं अबोला धरला होता. त्या प्रसंगास अनुलक्षून मिसेस पोलक लिहितात:- आम्हां सर्वांसच वातावरणांतील ताण जाचक वाटूं लागला होता. कस्तूरबाईंनीं मला विचारलें, " What the matter Mr. Polak? What for he cross? " ( मि. पोलकना काय झालं आहे? ते कां रागावले आहेत? ) " ते बापूंवर रागावले आहेत." मीं म्हटलें.
" What for he cross Bapu ? What Bapu done ? "
( ते बापूंवर कां रागावले आहेत? बापूंनीं काय केलं ? )

"बापूंनीं कांहींच केलं नाहीं म्हणून तर ते त्यांच्यावर चिडले आहेत."

नंतर मीं तें सर्व प्रकरण त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला.

"ओहो !" त्या गुणगुणल्या. मीं आपलें मत कोणत्याच पक्षीं दिलें नव्हतें, तरी माझ्या मनांत कोठें तरी अशी भावना आहे कीं माझे पती बापूंवर रागावले त्याबद्दल त्यांना फारसा खेद वाटला नाहीं. कधीं कधीं त्या स्वतःहि बापूंवर रागावत असत आणि म्हणून ज्या व्यक्तीला बापूंची कदर होती तीहि त्यांच्यावर चिडल्यामुळें स्वतःच्या रागावण्याचेंहि समर्थन झालें असें त्या मानीत होत्या.

**कस्तूरबाईं**च्या अभिमानी स्वभावाचा आणखी एक मासला मिसेस पोलक देतातः— एकदां कांहीं युरोपियन लोकांनीं गांधीजींच्या घरीं जेवावयास येण्याचें ठरविलें. गांधीजींना त्यांचा फारसा परिचय नव्हता आणि कस्तूरबाईंना तर मुळींच नव्हता. पाहुणे येतांक्षणींच त्यांनीं मोकळेपणानें आणि जवळ जवळ असभ्यपणेंच गांधीजींच्या घरगुती जीवनाबद्दल जिज्ञासा प्रकट केली आणि अगदीं खासगी स्वरूपाचे प्रश्नहि फार उद्धटपणें विचारिले. गांधीजींनीं सौम्यपणें त्यांचीं उत्तरें दिलीं. आणि हिंदी लोकांच्या रीतिरिवाजाबद्दल त्यांनीं केलेल्या अनेक चुकीच्या विधानांना ते हंसले. **कस्तूरबाई** सुरवातीपासूनच त्यांच्यावर चिडल्या होत्या आणि आम्ही जेवण्यास बसण्यापूर्वींच त्या अदृश्य झाल्या. गांधीजींनीं त्यांना बोलावणें पाठविलें पण त्या आल्या नाहींत. गांधीजी स्वतः पत्नीच्या शोधार्थ गेले तेव्हां त्या स्वतःच्या खोलींत त्यांना आढळल्या; पण खालीं येण्याचें त्यांनीं नाकारलें. भोजन आटोपलें. .... दुसऱ्या दिवशीं कस्तूरबाईंची भेट झाल्यावर

त्या मला म्हणाल्या, “बेकार लोकांनीं आपलें कुतूहल शमविण्या-साठीं आमच्या घरीं येऊं नये. त्यांच्या करमणुकीसाठीं माझें घर किंवा मी नाहींत. तसले लोक आल्यास मी त्यांना मुळींच भेटणार नाहीं. बापूंनीं वाटल्यास स्वतः भेटावें.” मला वाटतें, गांधीजींनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनीं आपलें मत सोडलें नाहीं आणि आम्हीं कितीहि युक्तिवाद केला तरी त्याचा त्यांच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं.

पहिलें महायुद्ध संपल्यानंतर महात्माजींना आमांशाची व्याधि जडली होती व एका प्रसंगीं तर मृत्यु सन्मुख उभा असल्याचें त्यांस भासलें. त्या समयीं मिसेस पोलक हिंदुस्थानांत होत्या. तथापि त्या महात्माजींसन्निध नव्हत्या. महात्माजींनीं त्यांना शेवटचें पत्रहि पाठ-विलें होतें. पुढें प्रकृति सुधारल्यावर दोघांची भेट झाली आणि आपली प्रकृति कशी सुधारली त्याचें वर्णन महात्माजींनीं मिसेस पोलकजवळ केलें. ज्या भौतिक शरीरामुळें एवढे त्रास व अडचणी त्यांना पीडा देत होत्या त्याला वांचविण्यासाठीं दूध हा एकमात्र उपाय असेल तर तें शरीर सोडण्यांतच त्यांना आनंद वाटला असता. पण प्रतिज्ञा मोडून दूध पिणें त्यांना पसंत नव्हतें. नंतर ते म्हणाले, “शेवटीं बानें मार्ग शोधून काढला. ती मला म्हणाली,— तुमची प्रतिज्ञा गायीम्हशींच्या दुधाबाबत होती. बकरीच्या दुधाबाबत नव्हती. मग बकरीचें दूध घ्या आणि प्रतिज्ञापालनहि कायम ठेवा. “ तुम्ही स्त्रिया फार चिवट व चतुर असतां,” ते म्हणाले. हे शब्द उच्चार-तांना त्यांच्या नेत्रांत मस्करीची चमक होती आणि आवाजांत कस्तुर-बाईबद्दल कौतुक मिश्रित झालें होतें.

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह-युद्धांत स्त्रियांस सामील करून घ्यावयाचा निश्चय महात्माजींनीं केला तेव्हां फिनिक्स-आश्रमांतील स्त्रियांशीं चर्चा करण्यास ते गेले. कस्तूरबाईंना त्यांनीं प्रथमतः मुळींच विचारलें नाहीं. त्याचीं कारणें ते लिहितात: " हा विषय माझ्या पत्नीसमोर मुळींच न काढण्याचा निश्चय मीं केला. कारण माझ्या कोणत्याहि योजनेला ती नकार देऊं शकत नव्हती. आणि तिनें होकार दिला असता तर त्या होकाराला किती किंमत द्यावी तेंहि मला कळलें नसतें. अशा गंभीर बाबतीत पतीनें पत्नीला स्वतंत्र निर्णय घेण्यास मोकळीक द्यावी. आणि तिनें कांहींच केलें नाहीं तरी रागावूं नयें, असें माझें प्रांजळ मत होतें." परंतु कस्तूरबाईंना या योजनेची गुणगुण लागलीच व त्या महात्माजींस म्हणाल्या, " तुम्हीं मला विश्वासांत घेत नाहीं त्याचें दुःख वाटतें. माझ्यांत काय दोष आहे? मीं तुरुगांत कां जाऊं नये? इतरांना सांगतां तें मला कां सांगत नाहीं? महात्माजी म्हणाले, " तुला दुःख देणें माझ्या हातून घडणार नाहीं. तुझ्यावर विश्वास नसण्याचा सवालच नाहीं. तूं तुरुंगांत गेलीस तर मला आनंदच वाटेल. पण माझ्या आग्रहावरून तूं गेलीस असें दिसून येतां कामा नये. अशा बाबतींत प्रत्येकानें स्वतंत्रपणें स्वतःच्या शक्तीवर आणि धैर्यावर विसंबून राहावें. तूं चळवळींत पडल्यावर मध्येंच तुझें अवसान गळालें तर त्यांत तुझा दोष मी पाहणार नाहीं, पण मग माझें काय होईल? जगांत मला तोंड राहील कां? " पण कस्तूरबांनीं महात्माजींना आश्वासन दिलें, " माफी मागून मी तुरुंगांतून सुटलें तर तुम्ही माझा त्याग करा. जर तुम्ही व मुलें कष्ट सोसूं शकतां तर माझ्यानेंहि तें कां होणार नाहीं? मी युद्धांत भाग घेण्यास बद्ध झालें

आहे." मग मीहि तुला चळवळींत सामील करून घेण्यास बद्ध झालें आहें." महात्माजी म्हणाले.

महात्माजींनीं लॉर्ड वेव्हेल यांच्या दुखवट्याच्या संदेशास उत्तर देतांना कस्तुरबांना दिलेली पुष्पांजलीच त्यांचें यथार्थ वर्णन होऊं शकेल.

" सामान्य जोडप्यांपेक्षां आमच्यांत कांहीं वैशिष्ट्य होतें. इ. स. १९०६ मध्यें परस्परांच्या संमतीनें आणि अजाणतेपणीं कसोटींतून पसार झाल्यावर आम्हीं संयम हा आमचा जीवनधर्म बनविला. यामुळें आम्ही दोघे पूर्वीं कधींही नव्हतीं इतकें निकट बद्ध झालों; त्यामुळें माझा हर्ष वाढत गेला. आमच्यांत वेगळेपणा राहिलाच नाहीं. माझी इच्छा नसतांना तिनें स्वतःस माझ्याशीं ओतप्रोत करून घेतलें. परिणाम हा आला कीं ती माझी खरीखुरी अर्धांगी बनली. आमच्या पूर्ववयांत मला ती हेकड वाटत असे. पण खरोखर ती प्रखर इच्छाशक्तीची स्त्री होती. या इच्छाशक्तीमुळेंच ती अजाणतेपणें अहिंसक असहकारितेच्या कलेंत आणि आचरणांत माझी गुरु बनली. माझ्या कुटुंबांतच तिच्या क्रियेस प्रारंभ झाला. १९०६ त जेव्हां मी तिचा प्रयोग राजकीय क्षेत्रांत केला तेव्हां तिला सत्याग्रह हें अधिक व्यापक नांव मुद्दाम देण्यांत आलें. श्रीकस्तूरबा सुरवातीच्या सत्याग्रह्यांपैकीं एक होत्या. माझ्यापेक्षां अधिक खडतर शारीरिक कसोटींतून त्यांना जावें लागलें. जरी यापूर्वी त्यांना अनेक वेळां बंदिवास मिळाला होता तरी सध्यांचा बंदिवास त्या सहन करूं शकल्या नाहींत........

---कु. प्रेमाबाई कंटक

आश्रम, सासवड

# कै. पूज्य कस्तूरबा

कै. पू. **कस्तूरबांच्या** आठवणी पुष्कळच आहेत. व त्या सर्वच माझ्या दृष्टीनें हृदयंगम आहेत. पण त्या कागदावर उतरविणें मला कठीण वाटत आहे. तथापि श्री. दादा कुळकर्णींच्या आग्रहास्तव सर्वांत पहिली व सर्वांत शेवटली, अशा दोन आठवणी कागदावर उतरविण्याचा प्रयत्न करते. पुस्तक प्रकाशनाच्या सांच्यांत त्या कितपत बसतील, तें प्रकाशकांनीं पाहून घ्यावें !

पहिली आठवण १९२६ सालीं डिसेंबर मधें वर्धा येथें झालेल्या माझ्या लग्नांतली. पू. बापूंच्या हस्तें माझं लग्न व्हायचं होतं म्हणून, आम्ही गांवाहून वर्ध्याला गेलों होतों. आई-वडील सोडून, घरची सर्व मंडळी, आश्रम-पद्धतीनें लग्न होणार म्हणून जरा खट्टूच होती. विवाहाचें २-४ तास आधीं. पू. **बा** आम्ही उतरलों होतों तेथ आल्या. ठेंगण्या ठुसक्या पण रुबाबदार, प्रसन्न मुद्रेच्या, मूर्तीनें येतांच आम्हा सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. नमस्कार इ. झाल्यावर बोलणं सुरु झालं. दुभाष्याचं काम श्रम जानकीदेवी बजाज ह्या करीत होत्या. कारण त्या वेळेस आम्हांला कुणालाच हिंदी अथवा गुजराती फारसं येत नव्हतं. **बां** ना पण मराठी येत नव्हतं. थोडं फार मराठी बोललेलं कळत होतं. हिंदी पण गुजरातीमिश्रितच बोलत. जानकीदेवींनीं आपल्या नेहमींच्या विनोदी पद्धतीनें आम्हा सर्वांची **बां** ना ओळख करून दिली.

बोलतां बोलतां आमच्या आजींनीं आश्रमीय लग्नपद्धतिविषयीं नापसंती बोलून दाखवली. मला वाटलं, आतां या बाई काय म्हणतील? या म्हाताऱ्या बायकांना, कुणाची भीड, मुरवत कांहीं ! असा विचार माझ्या मनांत आला असेल नसेल, इतक्यांत बांच्या निर्व्याज हंसण्यानें माझं लक्ष वेधलं. किती सहजपणें त्या हंसल्या, व म्हणाल्या, "तमने खोटू तो लागवानुंज. केम के पेहला तो एवुं नो हतुं ने. पण पेहला करतां आ आश्रम पध्दति सारी छे" मराठींत त्यांचं म्हणणं देतें. तुह्मांला जरा वाईट तर वाटणारच. कारण जुन्या काळीं असं नव्हतं ना. पण जुन्या पध्दतिपेक्षां ही आश्रम-पध्दत चांगली आहे. नसते विधी व सोहळे आणि भरमसाट खर्च ह्यांना रजा देऊन आवश्यक तो विधि ह्यांनीं ठेवला आहे. वगैरे त्या इतक्या मिठ्ठासपणें सांगत होत्या कीं, त्यावर चर्चा करण्याची कुणालाच इच्छा झाली नाहीं. शांतपणें सर्व ऐकत होतों. सर्वांवर काय छाप पडली असेल ती असो. पण माझ्यावर अशी छाप पडली कीं, " ही बाई किती सहजपणें आपले पूर्वींचे रूढ, आचार विचार पू. बापूंच्या मताबरहुकूम, बदलू शकत असली पाहिजे!" किती निष्ठेनें बोलत होत्या त्या. त्या आमच्या निवासस्थानीं येऊन गेल्यामुळें कांहींच्या मनांत जो उद्वेग होता तो जाऊन कुतूहल निर्माण झालं.— " पाहूं तरी आश्रमीय लग्नपद्धति कशी काय आहे ती. " आमच्या आजींना फार आवडल्या बा. बा परत गेल्यावर त्या म्हणाल्या, ' या महात्मा गांधींची बायको त्याला साजेशीच आहे अगदीं. कशी वकीली करीत होती आपल्या नवऱ्याच्या मताची ऽऽ ! याला म्हणावं बायको !" जुन्या नव्या मंडळींचा सारखाच प्रेमभाव संपादण्याची कला साधणं

किती अवघड आहे, याची कल्पना सर्वांना आहेच. वरील प्रसंग विस्तारानें येवढ्यासाठीं दिला कीं, पू. बांच्या ठिकाणीं, नम्रपणा, प्रेमळपणा व जोडीला तत्वनिष्ठा, किती उत्कटपणें असली पाहिजे कीं, अगदीं जुन्या विचारांत रुळलेल्या आमच्या आजीच्या तोंडून वरील उद्गार बांच्या विषयीं निघावे. हा प्रसंग कोण कसा विसरेल ! जोडीला एक गोड गमतीची स्मृति वाढून पहिली आठवण संपवतें.

लग्नानंतर आम्हीं दोघं बांना नमस्कार करायला गेलों. आमच्या तोंडांत खडीसाखर घालण्यासाठीं म्हणून त्यांच्याजवळ खडीसाखरेचे २-३ खडे देण्यांत आले होते. माझी थोरली बहीण त्यांना समजाऊन सांगत होती कीं, वधुवरांनीं तुम्हांला नमस्कार केल्यानंतर त्या दोघांच्या तोंडांत ही खडीसाखर घाला. बां नीं हां हां म्हणून समज-ल्याचं दर्शवलं. झालं. आम्ही नमस्कार करून उभे राहिलों असूं नसूं तोंच ते खडीसाखरेचे खडे, त्यांनीं आपल्या स्वतःच्या तोंडांत पटकन टाकले. हें पाहून सर्वांनाच हंसू यायला लागलं. त्यांनीं ज्या पद्ध-तीनें ते खडीसाखरेचे खडे तोंडांत टाकले व हंसून आम्हाला उद्देशून म्हणाल्या. " छान झालं, दोघं चिरंजीव व्हा. व सुखानें संसार करा. " त्या वेळचं तें दृश्य, बां नीं आमच्या तोंडांत खडीसाखर घालून जी गोडी चाखायला मिळाली असती, त्यापेक्षां किती तरी पटीनें गोड होतें.

शेंवटली आठवण १९४२ च्या ऑगस्ट २ तारखेची. अे. आय्. सी. सी. च्या बैठकीकरतां बापूजी मुंबईला जाण्यास निघाले. त्या-वेळीं बां ना सेवाग्रामलाच राहण्याविषयीं बापू सांगत होते. पण बा कुठल्या रहायला ? त्यांनीं ' मी बरोबर येणार ' म्हणून सांगितलें.

बापूजींना पण त्यांचा निश्चयी स्वभाव माहीतच होता. तशांत ती वेळहि मोठी आणीबाणीची होती. तेव्हां हिंमतीनें व निष्ठेनें पतीच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या **बा** मागें थोड्याच राहणार !

सेवाग्रामहून जमनालालजींच्या बंगल्यावर मोटार आली. बापूजी मोटरमधेंच बसले होते. त्यांचं मौन होतं. व त्यांना काम पण खूप होतं. म्हणून त्यांनीं मोटारमधेंच बसून आपलं ऑफिस सुरूं केलें. **बा** खालीं उतरल्या. सर्वांचे नमस्कार घेत व उलट नमस्कार करीत हास्यमुखानें व्हरांडयांत येऊन बसल्या. मातेच्या सहज वात्सल्यानें, सर्वांच्या मुलांबाळांची विचारपूस केली. मेलची वेळ झाली म्हणून त्या मोटरमध्यें बापूंजींच्या वामभागीं, आपलं अर्धांगी पद यशस्वी करण्यासाठींच जणूं जाऊन बसल्या. मी व माझ्या धाकट्या बहिणीनें बापूजी व **बां** ना औक्षण करून ओंवाळलं. दुसऱ्याहि भगिनींनीं ओंवाळलं. प्रत्येकजण त्या महान जोडप्याला आपल्या डोळ्यांत सांठवून घेतांना दिसत होता. **बां** ना नमस्कार करतांना विचारलं " **बां** आतां कधीं येणार ? आपली भेट कधीं ? " हे प्रश्न ऐकून बापूजींनीं थोडं स्मित केलं व हातांनीं खूण करून, " शांत रहा, आपण लवकरच भेटूं " असं आश्वासन दिलं. **बा** म्हणाल्या, " तुम्हीं अगदीं घाबरूं नका. कधीं भेटूं, कसें भेटूं, तें राम जाणे, पण भेटूं येवढें निश्चित. सर्व शांत असा. " ज्या खंबीरपणें त्या बोलत होत्या, व आमच्या पाठीवर थाप मारीत होत्या, त्या प्रसंगाची आठवण झाली कीं, अजूनहि मान जरा ताठ झाल्यावांचून रहात नाहीं.

'**बा**' आज आपल्या मधून गेल्या असल्या, तरी आपल्या स्मृति मागें जिवंत ठेऊन गेल्या आहेत. त्यांच्या एकेका आठवणीनें, स्वाभिमानानें छाती फुलून जाते. व मान ताठ होते. अशा, मरून अमर झालेल्या **बां** ची आठवण झाल्यावर, कोणीहि हात जोडून, मस्तक ठेंगणें करून, भारावलेल्या अंतःकरणानें, अन्तर्धान पावलेल्या मूर्तीला अभिवादन केल्याशिवाय कसा राहील ?

—सौ. शरयू धोत्रे
बजाजवाडी वर्धा.

---

# पूज्य बा यांच्या कांहीं आठवणी

पूज्य **बा** आणि बापू यांच्या प्रेमळ सहवासांत कांहीं काळ राहण्याची संधि मला ईश्वरकृपेनें १९४१ सालीं मिळाली होती.

गोष्टी क्षुल्लक असतात. पण त्यांच्या गोड स्मृति कायम टिकतात. सेवाग्राम आश्रमांत त्या वेळीं एकादशीचा उपास करणाऱ्या आम्ही दोघीच: **बा** आणि मी. तेथें माझें राहण्याचें ठरल्यानंतर एक दिवस बोलतां बोलतां 'मला एकादशीचा उपास असतो' असें मी **बां** जवळ बोललें होतें; आश्रमांत दूध फळें असतातच, त्यांवर माझें सहज़च भागेल, माझ्यासाठीं फराळाचें बनविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असेंहि त्यांना त्याच वेळीं सांगून ठेवलें होतें.

पण तेवढ्यावरून एकादशीच्या आदल्या दिवशीं ' उद्यां एकादशी आहे ' अशी **बां** नीं मला आठवण केली. दुसरे दिवशीं स्वैपाकघराच्या एका कोपऱ्यांत त्या कांहीं तरी पदार्थ तयार करतांना मला दिसल्या. पण मी माझ्याच कामाच्या नादांत असल्यानें त्या काय करीत आहेत इकडे मीं लक्ष दिलें नाहीं. दुपारच्या जेवणाची घंटा झाली. ताटवाटी घेऊन मी माझ्या रोजच्या जाग्यावर जाऊन बसलें. आज एकादशी आहे, आठवण आहे ना ? **बा** मला म्हणाल्या. मला थोडें लाजल्यासारखें झालें; कारण त्यांनीं आदले दिवशींच एकादशीची आठवण दिली असूनहि त्यावेळीं ती गोष्ट माझ्या स्मरणांतून अजीबात नाहींशीच झाली होती. जरासें हंसून त्यांचा प्रश्न ऐकला एवढेंच मीं त्यांना दर्शविलें. पण ' आपण जणूं आपल्या घरींच आहोंत ' असा मात्र मला त्यावेळीं एकदम भास झाला. मुलगी विसराळू असली तर विस्मरणानें तिचे नेमधर्म टळूं नयेत म्हणून आई त्याची काळजी वाहात असते, असें आपणांला कुटुंबांत अनेकदां दिसून येतें. त्यासारखीच आज येथें परिस्थिति झाली; त्यामुळें माझ्या मनांत एक प्रकारच्या कौटुंबिक आपलेपणाची भावना उत्पन्न झाली.

कांहीं वेळानें माझ्या ताटांत निरशनाचा एक सुंदरसा पदार्थ वाढला गेला. **बांनीं** स्वतःच्या ताटांत तर तो अगदीं चवी-पुरताच घेतला होता. कारण वृद्धपणामुळें त्यांना वाटेल तें पचत नसे. तें पाहून तर माझें मन भरून आलें. कारण तो पदार्थ त्यांनीं केवळ माझ्यासाठींच बनविला होता असें मला आढळून आलें. आणि त्यासाठीं त्यांनीं सकाळीं मेहेनतहि बरीच केली होती.

माझी इतकी काळजी वाहाण्याचें बांना वास्तविक कांहींच कारण नव्हतें; कारण आश्रम म्हणजे बांचें खासगी कुटुंब नव्हे. तेथें राहाणाऱ्या माणसांची व्यवस्था पहाण्यासाठीं व्यवस्थापक असतच. म्हणून कोणाची कांहीं गैरसोय झाली तर त्याचा दोष बांच्याकडे येण्यासारखा नव्हता. आश्रम हा कोणाहि एका व्यक्तीचें घर नाहीं; त्यांत राहाणाऱ्या प्रत्येकाचें तें स्वतःचें घर आहे; आणि म्हणून तेथें प्रत्येकानें अगदीं मोकळेपणानें आणि निःसंकोच राहिलें पाहिजे अशी बापूंची अपेक्षा आणि सांगी असे. त्यामुळें आम्ही आश्रमवासी तेथें आपल्या घराप्रमाणें राहात असूं; कोणाची कांहीं गैरसोय असेल तर ती व्यवस्थापकांच्या कानावर घालून तिचें निवारण करून घेत असूं. त्यांतून किरकोळ एकादी गैरसोय झालीच तर त्याचें आम्हांला कांहींच वाटत नसे. कारण बापूंच्या सान्निध्यांत राहाण्याची संधि मिळणें ही केवढी भाग्याची गोष्ट ! म्हणून, नको सांगितल्यानंतर बांना माझ्यासाठीं फराळाचें बनविण्याची दगदग करण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. पण जुन्या वळणांत वाढलेलें असें कष्टाळू वृद्ध माणूस तें. माझें थोडेंच ऐकणार ? दर एकादशीला माझ्यासाठीं त्या कांहीं ना कांहीं बनवीतच. त्यामुळें आईपेक्षां जास्त आईपण असलेल्या अशा त्या आजीच वाटत.

त्यांचें वय सत्तरीच्या पुढें गेलेलें होतें. तरी त्यांचा सबंध दिवस कामांत बांधलेला असे. बापू सकाळीं थोडी न्याहारी करून मग फिरायला जात. तर बा सकाळीं लवकर उठून त्यांच्या न्याहारीची स्वतः तयारी करीत; बापू न्याहारी करून फिरण्यासाठीं बाहेर पडले कीं मग त्या आपल्या दुसऱ्या कामाला लागत. दुपारीं

जेवण झाल्यावर बापूंच्या तळपायांना पूर्ण एक तासपर्यंत गाईचें तूप त्या चोळीत असत. रात्रींहि बापू आंथरुणावर आडवे झाले कीं या त्यांचें आंग चेपीत बसत. बापूंना झोप लागली कीं मग त्या आपल्या खोलीकडे जात. स्वतःच्या हातून पतिसेवा रोज घडलीच पाहिजे अशी त्यांची श्रद्धा असल्यानें आणि स्वभावाला आळस कसा तो माहीतच नसल्यानें अंगांत त्राण नसून असेल तेवढी शक्ति एकत्र करून त्या बापूंचीं वरील कामें व इतरहि कामें रोज करीतच करीत. ह्या सर्व कामांव्यतिरिक्त त्या रोज एक गुंडी सूत कांतीत.

'दुपारीं जेवणानंतर प्रत्येकानें अर्धा तास वामकुक्षी करणें—झोप न आली तरी आंथरुणावर निदान स्वस्थ पडून राहाणें प्रकृतिदृष्ट्यां अत्यंत आवश्यक आहे; त्यामुळें हृदयाला विश्रांति मिळते व रात्रींपर्यंत काम करीत राहायाला उत्साह येतो; आणि एकंदर शरीर चांगलें टिकतें असें आधुनिक शास्त्रज्ञांना आढळून आलें आहे. म्हणून दुपारच्या जेवणानंतर सर्वांनीं थोडी झोप अथवा विश्रांति ध्यावी' असें बापूंचें सांगणें असे. पण हा नियम पाळायला बांना आपल्या रोजच्या भरगच्च दिनक्रमांत वेळ होत असे कीं नाहीं शंकाच आहे. कारण बापूंच्या पायांना तूप चोळून त्या आपल्या खोलीकडे परतल्यानंतर पहावें तेव्हां त्या सूत कांततांना दिसत.

त्या इतक्या वृद्ध होत चालल्या होत्या; शरीर अगदीं सुकत चाललेलें दिसत असे; तरी दुसऱ्याकडून स्वतःची सेवा करून घेणे त्यांना पसंत नसे. बापूंप्रमाणें त्याहि शरिराचे आपण गुलाम न होतां शरीराला आपल्या गुलामाप्रमाणें वागवीत. त्यांचे चोजले

म्हणजे काय हें त्यांना माहीतच नव्हतें. ऊठ म्हटलें कीं शरीरानें तटकन उठलेंच पाहिजे. दूरची एकादी वस्तु त्यांना हवी असली कीं चटकन उठून त्या उभ्या राहात आणि ती वस्तु स्वतः आणून घेत. आसपास दुसरीं माणसें असलीं तरी कोणासहि त्या आपलें काम सांगत नसत त्यांनीं एकादें काम करायला सांगितलें तर धन्यता वाटेल अशा भावनेचीं माणसें आसपास असलीं तरी त्या स्वतःसाठीं कोणाला उठायला लावीत नसत.

एक दिवस जेवणावेळची प्रार्थना म्हणून झाल्यानंतर बा व बापू इतरांबरोबर जेवायला सुरवात करणार इतक्यांत बा एकदम उठून उभ्या राहिल्या. बापूंनीं कारण विचारलें. बा म्हणाल्या 'आपल्या पानांत एक वस्तु वाढायची राहिलेली दिसत आहे. माझ्या खोलींतून मी ती घेऊन येतें.' बापू म्हणाले 'अमतुलला सांग; ती घेऊन येईल; आंगांत नाहीं त्राण; आणि किती उठाबशा करशील?' असें म्हणून बापूंनीं बांचा हात खालीं ओढून त्यांना बसायला लावलें. त्यावर त्या बापूंना म्हणाल्या, 'अमतुलच्या आंगांत तरी कोठें त्राण आहे? ती आपल्या प्रकृतीकडे लक्ष देत नाहीं. पण तिला तुम्ही रागावत नाहीं. मला मात्र रागवतां' बापू हंसून विनोदानें म्हणाले 'बरोबर आहे. अमतुल स्वतंत्र आहे. तिच्यावर रागावण्याचा मला काय हक्क? तूं तिच्यासारखी स्वतंत्र कोठें आहेस? मीं तुला अजून स्वातंत्र्य कोठें दिलें आहे?' यावेळीं अमतुलबेन या समोरच उभ्या होत्या. त्या बांच्या नात शोभतील इतक्या लहान, पण स्वतःसाठीं दुसऱ्याला

तसदी देणें बांच्या वळणांतच नव्हतें. दुसऱ्याला काम सांगायचें त्यांनां सुचतच नसे. प्रत्येक कामासाठीं स्वतःच चटकन् उठायचें हाच स्वभाव. वयामुळें त्यांना सुस्ती किंवा जडत्व अजीबात आलें नव्हतें. याचा अर्थ त्यांचें शरीर कामाच्या लायक होतें असें मुळींच नाहीं. त्याला विश्रांतीची फारच जरूरी असे. पण शरीराला जपून वागविण्याची त्यांना गरजच भासत नसे—तें त्यांच्या लक्षांतच येत नसे.

**बा** आणि बापू नेहमीं शेजारीं शेजारीं जेवायला बसत; बापूंच्या डाव्या बाजूस **बांचें** पान असे. त्यावेळचें तें दृश्य मोठें रम्य दिसे. त्यांच्यामध्यें वरीलप्रमाणें संवाद-विनोद झाला म्हणजे ऐकणाराला मोठी गंमत वाटे. **बा** जेवणाचे वेळीं कधीं कधीं आश्रमीय कुटुंबांतील गोष्टी बापूंच्या कानावर घालीत. आई वडिल आपल्या मुलांविषयीं—कुटुंबाविषयीं पुष्कळदां जेवणाचे वेळीं चर्चा करतात; त्याची त्या वेळीं आठवण येई. दोघे सात्विकपणाच्या मूर्ति; दोघें पिकलीं पानें; दोघें समान वयाचीं; बापूंपेक्षां **बाच** कदाचित् मोठ्या असतील.

कारण त्या वर्षी बापूंच्या जयन्तिसप्ताहांत दर वर्षीप्रमाणें महिलाश्रमाच्या विद्यार्थिनी बापूंच्या दर्शनाला आल्या होत्या. व बापूंनीं त्यांना उपदेशपर असे चार शब्द सांगितले. त्या वेळीं स्वतःच्या जीवनविकासांत **बांचें** केवढें मोठें स्थान आहे, त्याचें वर्णन करतांना ते पुढील वाक्य अर्धवट विनोदानें बोलल्याचें मला स्मरतें. ' मी वयानें मोठा कीं **बा** मोठ्या याबाबत आम्हां दोघांमध्यें नेहमीं वाद होतो. **बा** माझ्यापेक्षां सहा महिन्यांनीं मोठ्या

आहेत अशी माझी समजूत आहे. पण बांना वाटतें कीं मीच त्यांच्यापेक्षां सहा महिन्यांनीं मोठा आहें. कारण पति हा पत्नीपेक्षां मोठाच असला पाहिजे. त्यांच्या बंधूकडून त्यांची पत्रिका मागवूनच त्या वादाचा निकाल लावला पाहिजे.'

पुढें कधीं ह्या वादाचा निकाल लागला कीं नाहीं माहीत नाहीं. पण दिसण्यांत मात्र त्या बापूंपेक्षां बऱ्याच वयस्क दिसत. कारण अलीकडे त्या थकतच चालल्या होत्या. आजारांची त्या बिलकुल पर्वा करीत नसत. अगदीं आंथरुणावरच पडायची वेळ आली कीं चार दिवस औषध घ्यायचें; जरा बरें वाटलें कीं रोजचीं ठराविक कामें स्वतःच्या हातून झालींच पाहिजेत. विश्रांति घेत नसत, आणि त्याबाबत त्या कोणाचेंहि ऐकत नसत. त्यांचें सर्व लक्ष बापूंच्या प्रकृतीकडे असे, स्वतःच्या शरीराची त्या बिलकुल परवा करीत नसत; त्यामुळें त्यांच्यावर बापूंच्या मानानें वृद्धपणाची कळा फार जास्त प्रमाणांत दिसे.

बापू फार विनोदप्रिय; एकाद्या लहान बालकाप्रमाणें ते गंमती करीत. पण बा तितक्याच गंभीर त्यामुळें त्या जास्त पोक्त दिसत. बापूंच्या जेवणाचे वेळीं तर त्या अगदीं त्यांच्या आईप्रमाणें वागत. मूल आईच्या शेजारीं जेवायला बसलें कीं तिचें सारें लक्ष मुलाचें जेवण नीट होत आहे कीं नाहीं इकडे असतें. तसेंच बापूंचें जेवण नीट होत आहे कीं नाहीं इकडे बांचें सगळें लक्ष. या मातृभावामुळें आम्हां मंडळींना त्या बापूंपेक्षां वडील भासत.

— श्री. लक्ष्मीबाई वैद्य
पुणें.

# बांची संस्मरणी

वज्रचुडेमंडित सौभ्याग्यलक्ष्मी श्री कस्तुरबा गांधी मंगळवार ता. २२-२-४४ रोजीं शिवरात्रीच्या पवित्र दिवशीं आगाखान पॅलेसमध्यें कारावासांत महात्माजींच्या निकट सान्निध्यांत स्वर्गवासी झाल्या. बांचा मृत्यु म्हणजे पतिव्रतेच्या पवित्र तेजाचं उदात्त उदाहरण आहे. महात्माजींच्या आयुष्याची नागवी तरवार बांना सदा भेडसावीत असे. दक्षिण आफ्रिकेंत बापूंवर केलेला सुऱ्याचा वार, त्यांतून बापूंचं वांचणं, त्याचप्रमाणें मरणाच्या दाढेंत नेणारे बापूंचे अनेक उपवास बांसारख्या साध्या भोळ्या पतिपरायण बाईच्या हृदयाचं पाणी पाणी करणारे होते. बा प्रत्येक वेळीं असेंच म्हणत असतील, 'देवा मला तूं ह्यांच्या आधीं ने;' आणि खरोखर त्यांच्या पातिव्रत्याच्या तेजानं त्यांची बाजू राखली. नवऱ्याच्या मांडीवर डोकें टेकून आलेला मृत्यु म्हणजे भाग्यवान् सौभाग्यवतीचं लक्षण आहे. तिचा चुडा वज्रासारखा कठिण होता म्हणूनच ४३ सालीं आगाखान पॅलेसमधील उपवासाच्या दिव्यांतून बापू पार पडले. ही पुण्याई बांची नाहीं तर कोणाची !

बापू ना. शास्त्रीजींना असें म्हणाले म्हणतात कीं, "आगाखान दरवाज्याच्या किल्ल्या अनेकांनीं मागितल्या परंतु त्या कोणालाहि मिळाल्या नाहींत. ती मेली पण आपली भेट करवून गेली." ह्यावरून बापूंना बांच्या बद्दल काय वाटत होतं हें स्पष्ट दिसतं.

बांच्या व बापूंच्या सेवाग्रामच्या झोपड्या अलग अलग आहेत परंतु एकमेकांचा जिव्हाळा त्यांच्या रोजच्या खाण्यापिण्याच्या बारीक सारीक व्यवहारांत सुद्धां दिसून येत असे. बापूंनीं खाल्ल्याखेरीज बा तोंडांत घांस घेत नसत आणि ह्यांच्या प्रकृतीची वास्तपुस्त बापू आपला रोजचा सगळा जगडव्याळ व्याप संभाळून करीत असत.

सहा सात वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. बापूंचा टॉवेल फाटला होता. बापू आंघोळ केलेल्या धोतरानेंच आपलें अंग कांहीं दिवस पुसत असत. बांना तें पहावत नव्हतं. त्या सहज म्हणाल्या "काय करावं नवा टॉवेल विकत आणवा म्हणतें पण ते आणीत नाहींत, आणि म्हणतात, हिंदुस्थानांतल्या किती लोकांना अंग पुसायला टॉवेल मिळतो ?" बा थोरा मोठ्या घरची मुलगी होती. थोरा मोठयांच्या घरांत पडली होती. परंतु तिला बिचारीला सबंध जीवनभर ध्येयवादी बापूंच्या विचारसरणीशीं जुळतं घ्यावं लागलं. बा शिकलेल्या नव्हत्या. त्यांना बापूंचे सर्व विचार व कल्पना नीट समजत सुद्धां नसतील. परंतु त्या आर्य महिला होत्या. पतीच्या विचारांना अनुसरणें, त्यांत समरस होणें हेंच आपलें कर्तव्य, ही उदात्तता त्यांच्या रोमरोमांत भिनली होती.

बापूंचे विचार हिमालयासारखे भव्य व अगम्य असतात. त्या हिमालयाच्या बरोबरीनें सतत राहण्याचा प्रयत्न बांनीं केला. इतकंच नव्हे तर त्यांचं अर्धांग बनून त्यांना कधींहि निरुत्साही न करतां त्यांचा विश्वकुटुंबी संसार-शकट उत्कृष्ट रीतीनं चालविला. पतीला पत्नीची त्याच्या विचारांत संपूर्ण साथ असली तरच पुढं

जातां येतं. मोठी इमारत विटा दगडांवर उभारली जाते. लोक इमारतीचं नांव गातात पण त्या इमारतीचं वैभव पायांत रचलेल्या दगडांवर उभारलेलं असतं तद्वत् बापूंचा मोठेपणा बांच्या स्वार्थत्यागामुळं, सहिष्णुतेमुळं व उदारतेमुळं वाढीला लागला. बा बापूंच्या मार्गांत धोंड झाल्या नाहींत हा बांमधील सर्वांत मोठा गुण म्हटला पाहिजे.

बापूंच्या विश्वकुटुंबी घरांत अनेक तऱ्हेचे व ठिकाणचे पाहुणे नित्य येत असतात. बा वयमानाप्रमाणें इतक्या थकलेल्या असतांना सुद्धां आल्यागेल्यांचं आदरातिथ्य मातृवत् आपुलकीनं करीत असत. महिलाश्रमाच्या मुलींना सेवाग्रामला नेण्याचे अनेक वेळा प्रसंग येत. आम्हीं तेथें स्वयंसेविकेच्या कडक शिस्तीनं जावं व रहावं अशी आम्हांला सैनिकशिक्षण देण्याच्या दृष्टीनं बापूंची इच्छा असे. त्या तऱ्हेनं आमचं खाणं पिणं असावं असं एकदां बापू म्हणाले. परंतु बांना तें आवडलं नाहीं. त्यांनीं आम्हांला मातृवात्सल्यानं थोडसं गोडधोड खायाला घातलंच आणि म्हणाल्या " ये बापु तुम्हारे ऐसेहि हैं, लडकियाँ आयीं उनका मुंह मीठा नहीं करना चाहिए क्या ? " सारांश त्यांचं सौजन्य व प्रेमळपणा त्यांच्या चेहऱ्याकडे पहातांच दिसून येई.

त्या नऊ दहा वर्षांच्या असतांना त्यांचं लग्न झालं होतं. सासरीं व माहेरीं सनातनी वातावरणांत वाढलेल्या स्त्रीचे धार्मिक संस्कार बापूंच्या इतके प्रगतदशेस पोहोचणं शक्य नव्हतं. डेलांग येथें भरलेल्या गांधी-सेवा-संघाच्या परिषदेच्या वेळीं बांना चारी धामांत गणलं जाणाऱ्या जगन्नाथपुरीचं दर्शन घेण्याचा मोह झाला. तें देऊळ

हरिजनांना खुलं नाहीं. हरिजनांच्या उद्धारासाठीं अहोरात्र तळमळणाऱ्या बापूंना जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हां त्यांना अत्यंत दुःख झालं. त्यासाठीं त्यांनीं तीन एक दिवसांचं उपोषण केलं आणि बांना अनेक तऱ्हेनं बोलून वर्तमानपत्रांतून सुद्धां त्यांचे धिंडवडे काढण्यास कमी केलं नाहीं. परंतु बा सहनशीलतेची मूर्तिमंत देवता होती. तिनं शेवटपर्यंत सर्व गोष्टी मोठ्या धीरानं सहन केल्या आणि पतिच्या ध्येयाला पूर्णता देण्यास सर्व तऱ्हेचा कमीपणा पण सोसला.

अशा राष्ट्रमातेचा आदर्श हिंदवासी भगिनींना खरोखरच मार्गदर्शक होईल. बांचं मरण हें त्यांच्या वयाकडे पहातां स्वाभाविक होतं. त्याबद्दल हळहळ वाटत नाहीं. परंतु ज्या परिस्थितींत त्यांना मरण आलं त्या परिस्थितीमुळं हृदय शतशः विदीर्ण होतं. राष्ट्रमातेचा अंत्यविधि सम्राज्ञीच्या थाटानं व्हावयास पाहिजे होता. परंतु परिस्थिति अशी कीं आम्ही एकत्र बसून उघडपणें अश्रूसुध्दां गाळूं शकत नाहीं !!!

शिवरात्रीला आलेला मृत्यु मनुष्याला सरळ कैलासाला नेऊन पोंहचवितो म्हणतात. बांचा पुण्यात्मा खरोखर त्याच योग्यतेचा होता. त्यांच्या जीवनांतील कस्तुरी सर्वांच्या हृदयांत दरवळो. त्या सुवासानं हिंददेश भरून जाईल तेव्हांच आजच्या क्षणाला अर्पण केलेल्या श्रद्धांजलीचं सार्थक झालं असं म्हणतां येईल.

—सौ. कमलाताई लेले
महिलाश्रम वर्धा.

२६९८
IRBK-0102614
IRBK-0102614

म. ग्रं. सं. ठाणे.

# बालमित्रमाला

या मालेच्याद्वारा लहान मुलांना रुचतील व पचतील असे विषय साध्या, सोप्या भाषेत पण आकर्षक मांडणी करून समजावून द्यावेत, असा हेतू मनाशीं धरला आहे. यांतील पहिला प्रयत्न म्हणून या मालेचा 'आमचे सण' हा पहिला सर आम्ही ओंवण्यास प्रारंभ केला आहे.

हिंदुस्थानांत आम्ही सर्व लोक जे सण, उत्सव व व्रतें साजरीं करतों आणि आपल्या अनुकरणशीलतेमुळें व उत्सवप्रियतेमुळें मुलेंहि ज्यांत हौसेनें भाग घेतात अशा प्रमुख सणादिकांची माहिती मुलांना मिळावी असा उद्देश हीं पुस्तकें लिहवून घेतांना ठेवला आहे. त्यांत सणादिकांची पौराणिक वा ऐतिहासिक पूर्वपीठिका, स्वरूप सांगून काळ पालटल्यामुळें या सणाचा आज आपण कसा उपयोग करून घेतला पाहिजे, याचीहि जाणीव आम्हांला मुलांत उत्पन्न करावयाची आहे. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून आमचीं मुलें निपजणार आहेत व तीं तशीं निपजावींत अशीच जाणीव व ध्येय ठेवून आम्ही हा सबंध बालवाङ्मय प्रकाशनाचा प्रयोग आरंभिला आहे.

## आमचे सण

तिळगूळ घ्या गोड बोला
महाशिवरात्र
होळी
गुढी पाडवा
सोन्याचा दसरा

## इतर

फुलराणी
गुलाबकळी
राया अथवा बाल मूर्तिकार
पुण्यश्लोक कस्तुरबा

## प्रकाशनाच्या वाटेवर

### आमचे सण

हरितालिका
नागपंचमी
राखी पुनव
मंगलमूर्ति
वसंत गौर
सती सावित्री

महाराष्ट्र ग्रंथ भाण्डार, कोल्हापूर